- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▶ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३५ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-


Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

## धर्मांतरविरोधी कायदा लागू

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर आणि अधिकृत राजपत्रात (गॅझेट) प्रकाशित झाल्यानंतर राज्यात धर्मांतरविरोधी कायदा-महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६ आता राज्यात लागू झाला. हा कायदा ३० जुलै रोजी अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाला आणि त्याच तारखेपासून तो अंमलात आला. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार आता राज्यात बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांत नवीन कायद्यातील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.




राज्य विधिमंडळाने मार्चमधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा कायदा मंजूर केला होता आणि त्यानंतर तो मंजुरीसाठी राज्यपाल व नंतर राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला होता. हा कायदा बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती किंवा लग्नाचे आश्वासन देऊन केल्या जाणाऱ्या धर्मांतरास प्रतिबंध करतो. या कायद्याचे उल्लंघन केल्यास ७ वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद आहे तर पुन्हा गुन्हा करणाऱ्यांसाठी ही शिक्षा १० वर्षांपर्यंत वाढू शकते.

धर्मांतरापूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना ६० दिवस आधी सूचना देणे यात अनिवार्य करण्यात आले आहे; तसेच धर्मांतरित व्यक्तीचे पालक, भावंडे आणि इतर नातेवाईक यांना तक्रार करण्याचा अधिकारही यात देण्यात आला आहे. विधानसभेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी), समाजवादी पक्ष आणि सीपीआय (एम) यांनी या विधेयकाला विरोध केला होता. मात्र, शिवसेनेने (ठाकरे गट) त्याला पाठिंबा दिला होता.

काँग्रेसच्या आमदारांनी विधानसभेत असा युक्तिवाद केला होता की, हा कायदा घटनाबा असून तो गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे. समाजवादी पक्षाचे म्हणणे होते की, हा कायदा एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य करण्यासाठी आणला गेला. विरोधकांची अशी मागणी होती की, हे विधेयक संयुक्त निवड समितीकडे पाठवले जावे.

**जबरदस्तीने होणारे धर्मांतर रोखले जाणार**

या कायद्याचे समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, बळजबरीने किंवा फसवणूक करून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालणे हा याचा उद्देश आहे; स्वेच्छेने होणारे धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाह यांना लक्ष्य करणे हा याचा उद्देश नाही. मध्य प्रदेश, ओडिशा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेश यांसारख्या किमान १२ राज्यांमध्ये यापूर्वीच धर्मांतर-विरोधी कायदा अस्तित्वात आहे. तसेच झारखंड, कर्नाटक, हरियाणा आणि राजस्थानमध्येही असे कायदे आहेत.

## विमान कोसळून १३ ठार

**वृत्तसंस्था, नाज्का**

पेरूमधील नाज्का शहराबाहेर पर्यटकांना घेऊन जाणारे विमान कोसळले आहे. ज्यात १३ जणांचा मृत्यू झाला. शनिवारी हे विमान पर्यटकांना नाज्का लाईन्स पाहण्यासाठी घेऊन जात होते असे नाज्का शहर प्रशासनाने म्हटले आहे. नाज्का लाईन्स म्हणजे शेकडो वर्षांपूर्वी पेरूच्या स्थानिक लोकांनी वाळवंटात कोरलेल्या भू-चित्रांचा एक संच आहे. या रेषा प्राण्यांच्या आकृत्या तयार करतात, ज्या केवळ विमानातून किंवा मनो-यातूनच पूर्णपणे पाहता येतात.

नाज्का सरकारने सांगितले की, या विमानाने जवळच्या इका शहरातून उड्डाण घेतले होते. पेरूची कंपनी एरोडियानाद्वारे हे विमान चालवले जात होते. ही कंपनी गेल्या १४ वर्षांपासून सेसना ग्रँड कॅराव्हॅन विमानांचा वापर करून नाज्का लाइन्सवर निसर्गरम्य हवाई सफरी आयोजित करत आहे. आता या अपघाताची चौकशी सुरू आहे असे पेरूच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. यावर तात्काळ प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

अपघातग्रस्त विमान पेरूच्या एरोडियाना या विमान कंपनीचे होते. हे विमान नाज्का लाइन्स पाहण्यासाठी पिस्को विमानतळावरून निघाले होते, परंतु उड्डाणानंतर काही मिनिटांतच नियंत्रण कक्षाशी त्याचा संपर्क तुटला असे स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले. अद्याप या अपघाताचे कारण समजले नाही. सध्या तपास सुरू करण्यात आला आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हीडीओंमध्ये अपघातस्थळी धूर निघताना आणि विमानाचे अवशेष एका कोरड्या शेतात विखुरलेले दिसत होते. या व्हीडीओंची स्वतंत्रपणे पडताळणी करता आली नाही.

**थोडक्यात**

### भारत-पाक संबंध ताणले

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध खूप अगोदरपासूनच बिघडलेले आहेत. या दोन्ही शेजारी राष्ट्रांमधील संबंध सुरळीत व्हावेत यासाठी अनेकदा प्रयत्न झाले. परंतु अद्याप यात यश आलेले नाही. २०२५ साली पहलगाम हल्ल्यानंतर तर भारताचे पाकिस्तानसोबतचे संबंध जास्तच बिघडले. भारत आणि पाकिस्तान यांच्यात आता कोणताही व्यापार होत नाही. भारताने पाकिस्तानसोबत कोणताही व्यवहार करणार नसल्याचे जाहीर केलेले असले तरीही पाकिस्तान मात्र भारताविरोधात अजूनही कुरापती करत असतो. भारताने पाकिस्तानची वेगवेगळ्या मार्गांनी कोंडी केलेली आहे. सिंधू जलवाटप करार स्थगित करण्याचा निर्णयही याच रणनीतीचा भाग आहे. दरम्यान, याच सिंधू जलवाटप कराराबाबत पाकिस्तानचे दुखणे काय आहे? याची भारताचे माजी राजदूत विनय महोन क्वात्रा यांनी पोलखोल केली आहे. अमेरिकेतील भारताचे राजदूत म्हणून काम केलेले विनय मोहन क्वात्रा यांनी सिंधू जलवाटप करारावर सविस्तर भाष्य केले आहे.

भारताने पाकिस्तानसोबत मैत्री आणि सद्भावनेच्या उद्देशाने हा करार केला होता. परंतु गेल्या कित्येक वर्षांपासून पाकिस्तानच्या आचरणात कोणताही बदल झालेला नाही, असे मत क्वात्रा यांनी व्यक्त केले आहे. न्यूजविक मध्ये त्यांनी एक लेख लिहिला आहे. या लेखात त्यांनी पाकिस्तान कोणती चूक करतोय. पाकिस्तान अजूनही मागे का आहे? याची कारणं सांगितली आहेत.

## नीट पीजी परीक्षा आता एकाच सत्रात

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

नीट पीजी २०२६ च्या उमेदवारांना आता दूरच्या परीक्षा केंद्रांवर जाण्याची किंवा ऐनवेळी प्रवासाची योजना आखण्याची घाई करावी लागणार नाही. ३० ऑगस्ट रोजी ही परीक्षा होणार आहे. केंद्र सरकारने उमेदवारांच्या सोयीसाठी अनेक नवीन नियम लागू केले आहेत. विद्यार्थ्यांना आता त्यांच्या घराच्या जवळचे परीक्षा केंद्र शोधण्याची, परीक्षा शहराबद्दल पूर्व माहिती मिळवण्याची, प्रत्येक प्रश्नासाठी अधिक वेळ मिळवण्याची आणि परीक्षेत पारदर्शकता राखण्यासाठी कडक सुरक्षा उपाययोजनांची सोय उपलब्ध असेल, असे सांगण्यात आले.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या नीट पीजी २०२६ परीक्षेपूर्वी हे बदल जाहीर केले आहेत. या बदलाचा उद्देश परीक्षा अधिक निष्पक्ष, सुरक्षित आणि पारदर्शक बनवणे, तसेच उमेदवारांवरील ताण कमी करणे हा आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी नीट पीजी २०२६ च्या तयारीचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांना कोणतीही अडचण न येता सुरक्षित, तंत्रज्ञान-आधारित पद्धतीने परीक्षा घेण्याचे निर्देश दिले. त्यांनी नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस, तांत्रिक टीम आणि इतर एजन्सींसोबत तयारीचा आढावा घेतला आणि उमेदवारांसाठी परीक्षा सुरळीत व निष्पक्ष होईल, याची खात्री करण्यावर भर दिला. यावर्षी नीट पीजी २०२६ साठी एकूण २७३,१८३ उमेदवारांनी नोंदणी केली आहे, जी गेल्या वर्षीच्या तुलनेत १२.५ टक्क्यांहून अधिक आहे.




परीक्षा केंद्र निवड प्रक्रियेत सर्वात महत्त्वाचा बदल करण्यात आला. पूर्वी उमेदवारांना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केंद्रे दिली जात होती. आता तसे होणार नाही. नवीन प्रणालीनुसार उमेदवारांना त्यांच्या परीक्षा केंद्रासाठी ३ पसंतीची राज्ये निवडावी लागतील. उमेदवारांना त्यांच्या राज्याला प्रथम प्राधान्य द्यावे लागेल. यामुळे उमेदवारांना त्यांच्या निवासस्थानाजवळ केंद्रे मिळतील, याची खात्री करण्यास मदत होणार आहे. पूर्वी उमेदवारांना अनेकदा शहर आणि परीक्षा केंद्राबद्दलची माहिती परीक्षेच्या काही दिवस आधीच मिळत असे, ज्यामुळे व्यवस्थापनात अडचणी आणि अतिरिक्त खर्च येत असे.

यासोबतच नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेसने परीक्षेच्या पद्धतीत सुधारणा केली असून, त्यात १८० बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला, ज्यांची उत्तरे २१० मिनिटांत देणे आवश्यक आहे. पूर्वी परीक्षेत २०० प्रश्न असत आणि कमाल गुण ८०० होते. एकूण कालावधी तोच राहिला असला तरी सुधारित स्वरूपामुळे उमेदवारांना प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी अधिक वेळ मिळतो. दरम्यान, गेल्या काही वर्षांत काही विशिष्ट परिस्थितींमुळे नीट पीजी परीक्षा २ सत्रांमध्ये घेतली जात होती. परंतु आता नीट-पीजी २०२६ परीक्षा एकाच सत्रात घेतली जाणार आहे. मंत्रालयाच्या मते, परीक्षा एकाच सत्रात घेतल्याने सर्व उमेदवारांसाठी समान पातळीचे प्रश्न सुनिश्चित होतील, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे अधिक निष्पक्ष आणि पारदर्शक मूल्यांकन होईल.

**जवळची केंद्रे मिळणे शक्य**

पूर्वी उशिरा नोंदणी करणाऱ्या उमेदवारांना अनेकदा जवळची केंद्रे पूर्णपणे आरक्षित आढळत असत आणि त्यांना परीक्षा देण्यासाठी दूरच्या राज्यांमध्ये प्रवास करावा लागत असे. उमेदवारांना ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या परीक्षेच्या सुमारे ३ आठवडे आधी त्यांच्या वाटप केलेल्या परीक्षा शहराबद्दल माहिती मिळेल, ज्यामुळे त्यांना प्रवास आणि निवासाची व्यवस्था करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे.

**कडक सुरक्षा व्यवस्था**

नीट-पीजी २०२६ परीक्षा सुरक्षित आणि पारदर्शक व्हावी, यासाठी केंद्र सरकारने सुरक्षा व्यवस्था आणखी मजबूत केली आहे. अजार्पासून ते परीक्षेच्या दिवसापर्यंत आधार-आधारित पडताळणीचा वापर केला जाईल. बोटांच्या ठशांची ओळख शक्य नसल्यास आयरीस बायोमेट्रिक प्रणालीचा वापर केला जाईल. प्रश्नपत्रिकांचे संरक्षण करण्यासाठी बहुस्तरीय एन्क्रिप्शन तंत्रज्ञान, सुरक्षित ऑफलाइन तयारी आणि परीक्षेपूर्वी नियंत्रित डिजिटल डिक्रिप्शन लागू करण्यात आले.

## तब्बल ६ वर्षांनंतर भारत-तिबेट व्यापार सुरू

**वृत्तसंस्था, पिथौरागढ**

उत्तराखंडमधील लिपुलेख खिंडीतून ६ वर्षांनंतर भारत-तिबेट पारंपरिक व्यापार शनिवारी पुन्हा सुरू झाला आहे. पहिल्या पथकात १६ भारतीय व्यापारी आणि ४ मदतनीस तिबेटमधील तकलाकोट मंडीत पोहोचले. विशेष बाब म्हणजे, इतिहासात पहिल्यांदाच भारतीय व्यापारी सामानाशिवाय चीनमध्ये गेले. सीमेवर चिनी प्रशासनाने त्यांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर त्यांना प्रवेश दिला, तर व्यापाऱ्यांचे सामान अजूनही पिथौरागढच्या गुंजी येथे ठेवलेले आहे. त्याचबरोबर, २०१९ पासून भारतीय व्यापाऱ्यांचा कोट्यवधी रुपयांचा मालही तकलाकोटमध्ये अडकलेला आहे. पहिल्यांदाच व्यापारी सामानाशिवाय सीमा पार पोहोचले. कोरोना महामारी आणि भारत-चीन संबंधांमधील कटुतेमुळे २०२० पासून दोन्ही देशांमधील पारंपरिक व्यापार पूर्णपणे बंद होता. या वर्षी जूनमध्ये व्यापार सुरू होणार होता, परंतु औपचारिकता आणि चीनकडून सतत बदलणा-या नियमांमुळे प्रक्रिया पुढे ढकलली जात राहिली. ८ जुलै रोजी व्यापारी सामान घेऊन गुंजीपर्यंत पोहोचले होते. त्यांना ट्रेड पासही जारी करण्यात आले होते, परंतु निघण्यापूर्वी एक दिवस आधीच चीनच्या पुरांग काउंटी प्रशासनाने व्यवस्था पूर्ण नसल्याचे कारण देत व्यापाऱ्यांची एंट्री थांबवली. त्यानंतर व्यापारी आपले सामान गुंजीमध्ये सोडून परत धारचुला येथे परतले.




**सध्या फक्त २० लोकांना मंजुरी**

व्यापार सुरू होण्याबाबत सीमावर्ती भागातील व्यापाऱ्यांमध्ये खूप उत्साह होता. प्रशासनाने १३४ व्यापारी आणि त्यांच्या सहायकांसाठी ट्रेड पास जारी केले होते. मात्र, नंतर चीनकडून नवीन आदेश जारी करण्यात आला आणि सध्या केवळ २० लोकांनाच तकलाकोटला जाण्याची परवानगी देण्यात आली.

## एका भरधाव कारने तीन स्वप्नांचा चुराडा!

### रस्त्याच्या कडेला उभ्या विद्यार्थिनींना मृत्यूने गाठले; एकीचा अंत, दोघी मृत्यूशी झुंज देत

### उमरेड-भिसी मार्गावरील हृदय पिळवटून टाकणारी दुर्घटना, सहलीचा आनंद क्षणात शोकांतिका

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

एका क्षणात आयुष्य कसे उद्ध्वस्त होऊ शकते, याचे काळीज पिळवटून टाकणारे उदाहरण रविवारी उमरेड-भिसी मार्गावर घडले. मुक्ताई येथे आनंदाने सहल करून परतणाऱ्या तीन तरुण विद्यार्थिनींना रस्त्याच्या कडेला उभे असतानाच भरधाव वेगाने आलेल्या वॅगनआर कारने अक्षरशः उडवून लावले.

या भीषण अपघातात रिया देवगिरकर (वय २०, रा. हिंगणघाट) हिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर मैथिली सामंत (वय १९, रा. नागपूर) आणि ट्विंकल चिकटे (वय २०, रा. चंद्रपूर) या दोघी गंभीर जखमी असून नागपूर येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

रिया, मैथिली आणि ट्विंकल या तिघीही नागपूर येथे शिक्षण घेत होत्या. त्या आपल्या एका मित्रासह दोन दुचाकींवरून चिमूर तालुक्यातील मुक्ताई येथे सहलीसाठी गेल्या होत्या. परतीच्या प्रवासात दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास उमरेड-भिसी मार्गावर पाणी पिण्यासाठी त्या रस्त्याच्या कडेला थांबल्या होत्या. मात्र, नियतीला काही वेगळेच मंजूर होते.

भिसीकडून उमरेडकडे भरधाव वेगाने येणाऱ्या वॅगनआर कारने अचानक त्यांना जोरदार धडक दिली. धडकेचा वेग इतका प्रचंड होता की तिन्ही विद्यार्थिनी हवेत उडून दूरवर रस्त्यावर फेकल्या गेल्या. घटनास्थळी उपस्थित असलेल्यांच्या अंगावर काटा आणणारे हे दृश्य पाहून परिसरात एकच आक्रोश उसळला.

या भीषण धडकेत रिया हिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. ती घटनास्थळीच बेशुद्ध पडली. मैथिलीच्या हात-पायाला, तर ट्विंकलच्या हाताला गंभीर दुखापत झाली. तातडीने तिघींना नागपूर येथे उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही रियाची मृत्यूशी सुरू असलेली झुंज अपयशी ठरली आणि तिचे निधन झाले. एका तरुणीचे स्वप्न कायमचे संपले, तर तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

या दुर्घटनेने पुन्हा एकदा भरधाव वाहनचालकांच्या बेफिकीर वृत्तीवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. रस्त्याच्या कडेला सुरक्षित उभे असलेल्या नागरिकांनाही जर जीव गमवावा लागत असेल, तर रस्त्यांवरील सुरक्षिततेची हमी नेमकी कोण देणार, असा संतप्त सवाल या घटनेनंतर उपस्थित होत आहे.

या प्रकरणी भिसी (जि. चंद्रपूर) पोलिसांनी अज्ञात वॅगनआर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून ठाणेदार भोंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती असून त्याचा शोध सुरू आहे.

एक आनंदी सहल... काही निरागस स्वप्ने... आणि भविष्याची असंख्य आशा... एका भरधाव कारच्या बेफिकीर वेगाने क्षणात हिरावून घेतल्या. रियाच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून, जखमी विद्यार्थिनी लवकर बऱ्या व्हाव्यात, अशी प्रार्थना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना खासगी प्रॅक्टिस बंदी कायम

**वृत्तसंस्था, मुंबई**

उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी ३० जुलै २०२६ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना खासगी वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. तयेच या विषयासंदर्भातील दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत.

मा. न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले की, शासन सेवेत कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा नियम व शासनाच्या धोरणानुसार बांधील असून, त्यांनी पूर्णवेळ शासकीय सेवा बजावणे अपेक्षित आहे. त्यामुळे शासकीय सेवेत असताना खासगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास परवानगी देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार असून, ग्रामीण व शहरी भागातील शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि रुग्णसेवा अधिक प्रभावी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकरणात शासनाच्या वतीने सहायक शासकीय अभियोक्ता अतुल काळे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. तसेच, आरोग्य विभागाचे विधी सल्लागार ॲड. सतीश भेंडेकर यांनी कायदेशीर मुद्द्यांची मांडणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व समन्वय साधून शासनाच्या बाजूला परिपूर्ण सहकार्य केले.

कायदेतज्ज्ञ आणि आरोग्य क्षेत्रातील जाणकारांच्या मते, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून, शासकीय सेवेतील शिस्त, उत्तरदायित्व आणि रुग्णहिताला प्राधान्य देणारा हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे, असे आरोग्य विभागाने कळविले आहे.

संपादकीय लेखणीतून...

# शहा नकोच!

दिल्लीतील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस अत्याचारावरून काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी बुधवारी आक्रमक झाले. पंतप्रधान मोदी यांनी गृहमंत्री अमित शहा यांची तातडीने हकालपट्टी करावी आणि या संपूर्ण प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली उच्चस्तरीय चौकशी करावी अशा मागण्या त्यांनी केल्या. संसदेबाहेर पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी आरोप केला की, त्यांना लोकसभेत बोलू दिले जात नाही. २० जुलै रोजी संसदेवरील मोर्चावर सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले, गृहमंत्र्यांनीच विद्यार्थ्यांवर पेलेट गन झाडण्याचे आणि खिळे लावलेल्या लाठ्यांनी मारहाण करण्याचे आदेश दिले असावेत किंवा त्यांना या प्रकाराची कोणतीही माहिती नसावी. जर त्यांनी आदेश दिले असतील तर ते या अत्याचारासाठी जबाबदार आहेत आणि जर त्यांना माहिती नसेल तर ते अकार्यक्षम आहेत. पेपरफुटीविरोधी विधेयकावरील चर्चेदरम्यान लोकसभेत राहुल गांधी यांच्या भाषणाच्या वेळी मोठा गदारोळ झाला. गृहमंत्री लोकसभेत उपस्थित नाहीत कारण ते घाबरले आहेत, असा आरोप त्यांनी केला. या वक्तव्याला सत्ताधारी खासदारांनी तीव्र आक्षेप घेतला. गृहमंत्र्यांनीच पोलिसांच्या कारवाईला परवानगी दिली होती, असे राहुल गांधी यांनी म्हणताच सभापती ओम बिर्ला यांनी तातडीने हस्तक्षेप करत स्पष्ट केले की, आजची चर्चा गृहमंत्र्यांवर केंद्रित नाही.

राहुल गांधींनी आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ पुरावे सादर करावेत असे निर्देशही त्यांनी दिले. दरम्यान, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेतला आणि त्यांच्या माफीची मागणी केली. तुम्ही कोणत्या आधारावर हे वक्तव्य करत आहात, हे अत्यंत आक्षेपार्ह असून त्यांनी माफी मागितली पाहिजे, असे रिजिजू म्हणाले. या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज दोन वेळा स्थगित करावे लागले. एका १८ वर्षीय विद्यार्थिनीशी झालेल्या संवादाचा संदर्भ देत राहुल गांधी यांनी विद्यार्थी, सर्वज्ञानी समजणारे आणि अंधभक्त यांच्यातील फरक सभागृहात मांडला. विद्यार्थी नम्र असतो आणि सत्याची कास धरतो, तर दुसरी श्रेणी स्वतःला देव समजून खोटे बिंबवण्याचा प्रयत्न करते आणि तिसरी श्रेणी म्हणजेच अंधभक्त दुसऱ्या श्रेणीला देव मानू लागते, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

संसदेतील गदारोळात केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी विद्यार्थी आंदोलकांवरील पोलिस कारवाईचे समर्थन केले. काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या टीकेला उत्तर देताना त्यांनी आणीबाणीच्या काळातील स्वतःच्या अटकेची आठवण करून दिली. जेएनयूचे विद्यार्थी नेते घोष यांना अटक करण्यासाठी काही साध्या कपड्यातील पोलिस मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुख्यालयात गेले होते. त्यावरून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. याबाबत नड्डा म्हणाले, हा एक कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या प्रक्रियेतील सामान्य भाग आहे. मी स्वतः विद्यार्थी कार्यकर्ता होतो. काँग्रेसच्या राजवटीतील आणीबाणीच्या काळात मला वर्गातून अनेक वेळा अटक करण्यात आली होती. ते पुढे म्हणाले की, आंदोलन करणाऱ्यांनी कायदा स्वतःच्या हाती घेतल्यास त्याचे परिणाम भोगण्याची तयारी ठेवली पाहिजे. ही सामान्य परिस्थिती आहे. कायदा व सुव्यवस्था स्वतःच्या हाती घेणाऱ्यांवर पोलिसांना कारवाई करावी लागते. संबंधित प्रकरणामध्ये पोलिसांनी त्यानुसार कारवाई केली आहे. नड्डा यांच्या वक्तव्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीने केंद्र सरकारवर टीका केली. पक्षाचे प्रवक्ते आशुतोष रांका यांनी ह्यएक्सह्ववरील पोस्टमध्ये म्हटले की, गत ५० वर्षांत देशाने अजिबात प्रगती केली नाही, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? सीजेपीने असा दावा केला की, सध्याच्या पोलिस कारवाईची तुलना आणीबाणीतील अटकेशी करणे म्हणजे गेल्या पाच दशकांत मतभेद आणि आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीत कोणतीही सुधारणा झाली नसल्याची अप्रत्यक्ष कबुली देण्यासारखे आहे. विद्यार्थी हे दहशतवादी नसून या देशाचे भविष्य आहेत. सरकारने योग्य वर्तन केले नाही तर देशातील तरुण हे सरकार बदलून दाखवतील, असा इशारा सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी बुधवारी दिला. सरकारने विद्यार्थ्यांना त्रास देणे थांबवावे असेही ते म्हणाले. अनेक राज्यांत पोलिस विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना अटकेच्या धमक्या देत आहेत असे सांगून दीपके म्हणाले, उद्या सरकार सुधारले नाही तर आम्ही सरकार बदलू असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. ते पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी राजीनामा देऊन इन्फल्युएन्सर बनावे, कारण ते काम ते खूप उत्तम प्रकारे करू शकतात, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यामुळे विद्यार्थ्यांचा राग शांत झाला आहे, असा भ्रम सरकारने बाळगू नये. गरज पडल्यास याहून मोठ्या प्रमाणावर पुन्हा नवीन आंदोलन पुकारले जाईल असे दीपके यांनी स्पष्ट केले. प्रचंड गोंधळात लोकसभेत सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक दुरुस्ती विधेयक-२०२६ आवाजी मतदानाने संमत करण्यात आले. सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक दुरुस्ती विधेयक हे केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी २७ जुलै रोजी सभागृहात सादर केले होते. विधेयक संमत झाल्याने परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि निष्पक्षता वाढेल.

# 'खतरनाक' गेमिंगचा गेम; डायरीतील पासवर्ड शोधून २५ लाखांची चोरी

## अल्पवयीन प्रेयसीही सामील!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

आजचे युग हे हायटेक आणि डिजिटल युग आहे. एका क्लिकवर जगाच्या पाठीवर काहीही करणे शक्य झाले आहे. मात्र, विज्ञानाचा हाच वरदान ठरलेला पैलू योग्य संस्कार आणि संयमाच्या अभावी तरुण पिढीसाठी कसा शाप ठरतो आहे, याचे एक अंगावर काटा आणणारे आणि डोळे उघडणारे उदाहरण महाराष्ट्रातून समोर आले आहे. ऑनलाईन गेमिंगचे भयंकर व्यसन आणि घरातील एका डायरीत लिहून ठेवलेला पासवर्ड... या दोन गोष्टी एकत्र आल्या आणि एका सुशिक्षित कुटुंबाला तब्बल २५ लाख रुपयांचा फटका बसला.

या संपूर्ण गुन्ह्याचा जो 'मास्टरमाइंड' समोर आला आहे, तो ऐकून सायबर पोलीसही चक्रावून गेले. हा कट दुसरा कोणी नसून घरातीलच एका तरुणाने त्याच्या अल्पवयीन प्रेयसीच्या साथीने रचला होता. पत्रकारांनी या संपूर्ण प्रकरणाचा पडदाफाश केल्यानंतर आता डिजिटल सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**ऑनलाईन गेमिंगचे जीवघेणे जाळे आणि ३७ लाखांचे कर्ज** : या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असलेल्या तरुणाला मोबाईलवरील ऑनलाईन गेमिंग आणि बेटिंगचे (जुगार) प्रचंड व्यसन जडले होते. सुरुवातीला मनोरंजनासाठी आणि लहान-सहान रकमा जिंकण्याच्या नादात सुरू झालेला हा खेळ हळूहळू एका मोठ्या विळख्यात बदलला. हरलेले पैसे वसूल करण्यासाठी तो अधिक पैशांचे सट्टे लावत गेला.

अॅप्सवरील 'इन्स्टंट लोन' आणि ओळखीच्या लोकांकडून घेतलेल्या पैशांमुळे पाहता पाहता या तरुणावर तब्बल ३७ लाख रुपयांचे कर्ज झाले. कर्जदार पाठीमागे लागले होते आणि पैशांची तातडीने गरज होती. अशा अत्यंत मानसिक दबावाच्या परिस्थितीत, वैध मार्गाने एवढी मोठी रक्कम उभी करणे अशक्य असल्याने, त्याने गुन्हेगारीचा मार्ग निवडला.

**अल्पवयीन प्रेयसीचा 'खतरनाक' प्लॅन:**

या गंभीर समस्येतून बाहेर पडण्यासाठी तरुणाने त्याच्या एका अल्पवयीन प्रेयसीला सोबत घेतले. दोघेही वयाने लहान आणि कच्च्या मनाचे असले, तरी क्राईम थ्रिलर सिनेमे किंवा वेब सीरिज पाहून त्यांचे डोके गुन्हेगारीच्या दिशेने वेगाने चालले होते. तरुणाने आपल्या घरातील आर्थिक व्यवहारांची आणि लॉकरची माहिती प्रेयसीला दिली. त्यावर त्या अल्पवयीन मुलीने एक अत्यंत हुशार पण तितकाच धोकादायक प्लॅन तयार केला तो म्हणजे घरातूनच पैसे गायब करायचे, पण कोणाला संशय येणार नाही अशा पद्धतीने..

**एक छोटीशी चूक आणि २५ लाखांचा दरोडा:**

या कुटुंबातील एका ज्येष्ठ सदस्याला डिजिटल पासवर्ड, नेट बँकिंगचे पिन किंवा लॉकरचे कोड लक्षात ठेवणे कठीण जात होते. त्यामुळे त्यांनी सुरक्षेचा सोपा उपाय म्हणून घरातील एका खाजगी डायरीमध्ये हे सर्व पासवर्ड लिहून ठेवले होते. "आपल्या घरात कोण डायरी उघडून पाहणार?" या अतिविश्वासामुळे ती डायरी कपाटात सामान्यपणे ठेवली जात होती.

हीच चूक या तरुण जोडप्यासाठी सोपे साधन बनली. एका दुपारी घरात कोणी नसताना या दोघांनी ती पासवर्डची डायरी शोधून काढली. डायरीतील बँक खात्याचे तपशील आणि लॉकरचे पासवर्ड मिळवून त्यांनी अत्यंत चतुराईने टप्प्याटप्प्याने २५ लाख रुपये बँक खात्यातून आणि डिजिटल माध्यमातून उडवले.

जेव्हा कुटुंबाला बँक खात्यातील या मोठ्या तफावतीची जाणीव झाली, तेव्हा त्यांचे धाबे दणाणले. घरात कोणतीही चोरी झाली नव्हती, कुलूप तुटले नव्हते, तरीही २५ लाख रुपये गायब होते. अखेर हे प्रकरण सायबर पोलिसांकडे गेले. पोलिसांनी जेव्हा तांत्रिक तपास म्हणजे केला आणि आयपी अॅड्रेस ट्रॅक केले, तेव्हा या गुन्ह्याची लिंक घरातीलच तरुणापर्यंत आणि त्याच्या अल्पवयीन प्रेयसीपर्यंत पोहोचली. हा खुलासा होताच कुटुंबाच्या पायाखालची जमीनच सरकली. ही घटना केवळ एक गुन्हा किंवा बातमी नाही, तर आजच्या बदलत्या सामाजिक व्यवस्थेवर आणि डिजिटल जीवनशैलीवर ओढलेला एक तीव्र आसूड आहे. यातून आपल्याला महत्त्वाचे धडे मिळतात.

**पासवर्ड सुरक्षिततेचा भ्रम :**

आपल्या समाजात अजूनही अनेक जण डिजिटल गोष्टींबाबत अनभिज्ञ आहेत. पासवर्ड डायरीत लिहिणे, कपाटाच्या मागे चिकटवणे किंवा मोबाईलच्या 'Notes' मध्ये सेव्ह करणे अत्यंत असुरक्षित आहे. तुमचा पासवर्ड हा फक्त आणि फक्त तुमच्या डोक्यात स्मरणशक्तीत असायला हवा. तो कागदावर आला की त्याची गोपनीयता संपली, मग तो कागद घरात असो वा बाहेर. ऑनलाईन गेमिंगची नवी महामारी मुलांमध्ये जडत आहे. आज ड्रग्ज किंवा इतर व्यसनांइतकेच 'ऑनलाईन गेमिंगचे व्यसन' भयानक रूप धारण करत आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या आमिषाला बळी पडून अनेक तरुण मुले लाखो रुपयांच्या कर्जात बुडत आहेत. घरातील संवाद हरवलाय याकडे लक्ष द्यायला हवे. मुले मोबाईलवर नेमके काय करत आहेत? त्यांच्या बँक खात्यात अचानक पैशांची देवाणघेवाण वाढली आहे का? त्यांच्या वर्तनात चिडचिड किंवा नैराश्य आले आहे का? याकडे पालकांनी बारीक लक्ष देणे गरजेचे आहे. अनेकदा अतिविश्वास किंवा मुलांकडे दुर्लक्ष केल्यामुळे अशा घटना घडतात.

तंत्रज्ञान हे मानवी प्रगतीचे आणि सोयीचे एक उत्कृष्ट साधन आहे, मात्र त्याचा वापर करताना विवेक आणि सावधगिरी बाळगली नाही तर ते विनाशाचे कारण ठरू शकते. आजच्या काळात डिजिटल व्यवहारांचा विस्तार जितका वेगाने झाला आहे, तितक्याच वेगाने सायबर गुन्हेगारीचे स्वरूपही बदलले आहे. अशा वेळी माझ्या बाबतीत असे घडणार नाही किंवा घरातले लोक असा गैरवापर करणार नाहीत, हा अतिविश्वासच माणसाचा सर्वात मोठा शत्रू ठरतो. अनेकदा सोयीसाठी किंवा विस्मरणाच्या भीतीने बँक खात्यांचे पासवर्ड, एटीएम पिन किंवा लॉकरचे कोड डायऱ्यांमध्ये अथवा मोबाईलच्या नोट्समध्ये लिहून ठेवले जातात. परंतु, ही एकच छोटीशी चूक संपूर्ण कुटुंबाला मोठ्या आर्थिक आणि मानसिक संकटात टाकू शकते. म्हणूनच, डिजिटल सुरक्षिततेची पहिली पायरी म्हणजे घरातील अशा संवेदनशील डायऱ्या आणि कागदपत्रे तातडीने नष्ट करणे ही होय. आपले पासवर्ड केवळ स्वतःच्या स्मरणात ठेवणे, ते नियमितपणे बदलणे आणि कोणत्याही डिजिटल सुगावा मागे न ठेवणे हाच या अदृश्य धोक्यापासून वाचण्याचा एकमेव सुरक्षित मार्ग आहे, कारण डिजिटल जगात केवळ जागरूक राहणे आणि सावधगिरी बाळगणे हाच आपला सर्वोत्तम बचाव आहे.

तंत्रज्ञान आपल्या सोयीसाठी आहे, विनाशासाठी नाही. डिजिटल व्यवहारात 'अतिविश्वास' हाच सर्वात मोठा शत्रू ठरतो. आजच आपल्या घरातील अशा डायऱ्या नष्ट करा आणि आपले पासवर्ड सुरक्षित ठेवा, कारण सावधगिरी हाच एकमेव बचाव आहे. डिजिटल युगातील हा सुरक्षिततेचा सुवर्णमंत्र लक्षात ठेवायला हवा.

- ९५६१५९४३०६

# अजिंक्य रहाणेला मिळणारी पेन्शन व फायदे कसे असतील?

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारताचा दमदार फलंदाज व अपराजित कर्णधार अजिंक्य रहाणेने नुकतीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने एक व्हिडिओ शेअर करून क्रिकेटपटू म्हणून आपली कारकीर्द थांबवण्याचा आपला इरादा जाहीर केला. त्याने असेही सांगितले की तो क्रिकेटमध्ये सक्रिय राहील आणि आपले अनुभव व शिकवण उदयोन्मुख तरुण खेळाडूंना देईल. बीसीसीआयच्या निवृत्त खेळाडूंसाठी असलेल्या कल्याणकारी योजनेअंतर्गत रहाणे सर्वोच्च श्रेणीत येतो आणि त्याला वैद्यकीय लाभही मिळतील.

अजिंक्य रहाणेच्या पेन्शनबद्दल माहिती देण्यापूर्वी, बीसीसीआयला खेळाडूंच्या पेन्शनसाठी पैसे कुठून मिळतात हे जाणून घेऊया. बीसीसीआय एका विशेष कल्याणकारी प्रणालीद्वारे पेन्शनसाठी निधी पुरवते. प्लॅटिनम ज्युबिली कॉर्पस फंडाचा एक भाग आणि एक स्वतंत्र कल्याणकारी निधी आयपीएल प्लेऑफ सामन्यांमधून आणि तिकीट विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून येतो. निवृत्त खेळाडूंचे आर्थिक कल्याण सुनिश्चित करण्यासाठी याची स्थापना करण्यात आली होती.

अजिंक्य रहाणेला बीसीसीआयकडून पेन्शन मिळेल, पण त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईचे कर्णधारपद भूषवले आहे. एमसीएची देखील एक पेन्शन योजना आहे. तथापि, नियमांनुसार, रहाणे एकाच वेळी बीसीसीआय आणि एमसीएकडून पेन्शन घेऊ शकत नाही. मात्र, खेळाडूंना या दोन्हींपैकी एक निवडण्याचा पर्याय असतो. खेळाडू जास्त पेन्शनची निवड करू शकतात.

**अजिंक्य रहाणेला किती पेन्शन मिळेल?**

या धोरणांतर्गत, २५ किंवा त्याहून अधिक कसोटी सामने खेळलेल्या खेळाडूंना ७०,००० चे मासिक निवृत्तीवेतन मिळते. रहाणेने आपल्या कारकिर्दीत ८५ कसोटी सामने खेळले आहेत. त्याने भारतासाठी ९० एकदिवसीय आणि २० टी-२० आंतरराष्ट्रीय सामनेही खेळले आहेत. त्याला आयुष्यभर निवृत्तीवेतन मिळेल, मात्र त्यासाठी एक अट आहे. जर अजिंक्य रहाणेने बीसीसीआयमध्ये पगाराचे पद स्वीकारले, तर त्याचे निवृत्तीवेतन थांबवले जाईल. मात्र, त्याच्या राजीनाम्यानंतर किंवा मुदत समाप्तीनंतर त्याचे निवृत्तीवेतन पुन्हा सुरू होईल. रहाणेने आपल्या निवृत्तीच्या पोस्टमध्ये असेही संकेत दिले आहेत की तो प्रशिक्षण क्षेत्रातही उतरू शकतो.

**इतर कोणते फायदे उपलब्ध असतील?**

अजिंक्य रहाणे इंडियन क्रिकेटर्स असोसिएशनच्या संयुक्त वैद्यकीय विमा योजनेअंतर्गत १० लाख पर्यंतच्या वैद्यकीय विम्यासाठी पात्र आहे. क्रिकेटपटूची पत्नी आणि २५ वर्षांखालील अविवाहित मुलांनाही १० लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण मिळते. मोठ्या वैद्यकीय खर्चासाठी ते बीसीसीआयच्या मेडिकल बेनेव्होलेंट फंडातून अतिरिक्त आर्थिक मदतही घेऊ शकतात.

**अजिंक्य रहाणे: भारतीय क्रिकेटमधील 'क्लासिक' फलंदाज आणि अनोख्या विक्रमांचा धनी**

भारतीय क्रिकेट संघात शांत, संयमी आणि अत्यंत शिस्तबद्ध खेळाडू म्हणून अजिंक्य रहाणेची ओळख आहे. मैदानावर शांत राहून प्रतिस्पर्ध्यांना आपल्या कामगिरीने उत्तर देणारा रहाणे हा भारतीय संघाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. त्याच्या नावावर अशा काही खास नोंदी आणि विक्रम आहेत, जे त्याला इतर खेळाडूंपेक्षा वेगळे ठरवतात.

**अजिंक्य रहाणेच्या क्रिकेट कारकिदीर्तील काही खास आणि ऐतिहासिक विक्रमांवर टाकलेला हा एक दृष्टिक्षेप:**

कर्णधार म्हणून एकही आंतरराष्ट्रीय सामना न गमावण्याचा पराक्रम-

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाची सर्वात मोठी खासियत म्हणजे त्याची गमावण्याची भीती नसलेली शांत मानसिकता. कर्णधार म्हणून त्याने आतापर्यंत भारतीय संघाचे नेतृत्व करताना एकही आंतरराष्ट्रीय सामना गमावलेला नाही. दबाव असतानाही संघाला विजयाकडे कसे न्यायचे, हे त्याने अनेकदा सिद्ध केले आहे.

**एकाच टेस्ट मॅचमध्ये सर्वाधिक झेल (कॅच) घेणारा भारतीय क्षेत्ररक्षक**

रहाणे केवळ उत्तम फलंदाजच नाही, तर जगातील सर्वोत्तम स्लिप फिल्डर्सपैकी एक आहे. विकेटकीपर सोडून एकाच टेस्ट मॅचमध्ये सर्वाधिक कॅचेस घेण्याचा विक्रम त्याच्या नावावर आहे. २०१५ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या गॉल टेस्टमध्ये त्याने ८ झेल पकडून हा ऐतिहासिक विक्रम रचला होता.

**आयपीएलमध्ये एकाच षटकात ६ चौकार मारणारा पहिला फलंदाज**

अजिंक्य रहाणेला बऱ्याचदा क्लासिक आणि पारंपरिक क्रिकेट खेळणारा खेळाडू मानले जाते, परंतु त्याने टी-२० फॉरमॅटमध्येही आपला दबदबा निर्माण केला आहे. आयपीएलच्या इतिहासात एकाच षटकात ६ चौकार ठोकणारा तो पहिला फलंदाज ठरला होता.

**गाबा ब्रिस्बेन येथे कसोटी सामना जिंकणारा एकमेव आशियाई कर्णधार**

२०२०-२१ च्या ऐतिहासिक ऑस्ट्रेलिया दौऱ्यात, गाबा (ब्रिस्बेन) येथील ३२ वर्षांची ऑस्ट्रेलियाची अपराजित मालिका मोडून काढत भारताने सनसनाटी विजय मिळवला होता. या ऐतिहासिक सामन्यात भारतीय संघाचे नेतृत्व अजिंक्य रहाणे करत होता. गाबा येथे कसोटी सामना जिंकणारा तो एकमेव आशियाई कर्णधार आहे.

**थोडक्यात सांगायचे तर...**

अजिंक्य रहाणे हा केवळ धावा काढणारा फलंदाज नसून, कठीण प्रसंगात संघासाठी ढाल बनणारा आणि मैदानात अप्रतिम नेतृत्व करणारा खरा योद्धा आहे!

- ९०९६३७२०८२

# भारतीय राष्ट्रध्वज तिरंगाचे जनक: पिंगाली वेंकय्या

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

भारतीय राष्ट्रध्वज तिरंगाचे रचनाकार पिंगली वेंकैया यांच्याबद्दलच्या १० खास गोष्टीः- वयाच्या १९व्या वर्षीच ते ब्रिटीश लष्करात भरती झाले. ते दक्षिण आफ्रिकेमधील अँग्लो बोअर युद्धामध्ये सैनिक म्हणून ब्रिटिशांच्या बाजूने लढले. याच काळात त्यांची आणि महात्मा गांधींची दक्षिण आफ्रिके मध्ये भेट झाली. त्यानंतर पुढील पन्नास वर्षाहून अधिक काळ हे दोन्ही नेते एकमेकांच्या संपर्कात होते. पिंगली हे जियोलॉजीमध्ये डॉक्टरेट होते. ते हिरे खाण उत्खन्नातील तज्ज्ञ होते. त्यामुळेच त्यांना डायमंड वेंकैया हे टोपणनाव देण्यात आले होते. त्याचप्रमाणे कापसावरील संशोधनामध्ये त्यांना विशेष स्वारस्य असल्याने त्यांना कॉटन वेंकैया नावानेही ओळखले जायचे. त्यांना उर्दू तसेच जपानी भाषेबरोबरच इतरही अनेक भाषा अवगत होत्या. ३१ मार्च १९२१ मध्ये पिंगली यांनी विजयवाडा येथे झालेल्या काँग्रेस कार्यकारणीच्या बैठकीमध्ये भगव्या आणि हिरव्या रंगाचा झेंडा भारतीय राष्ट्रध्वज म्हणून सादर केला.

मूळचे जालंधरच्या असणाऱ्या लाला हंसराज यांनी या झेंड्यावर चरखा असावा असे सांगत चरख्यासहीत हा झेंडा सादर केला तर गांधीजींनी भगव्या आणि हिरव्या रंगाच्यामध्ये पांढऱ्या रंगाच्या पट्टीचा सल्ला दिला. आणि अशाप्रकारे तिरंग्याचा जन्म झाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पिंगली यांच्या कल्पनेतून साकारलेल्या तिरंगी झेंड्याला भारताचा राष्ट्रध्वज म्हणून मान्यता मिळाली. भारतीय संविधान समितीने २२ जुलै १९४७ रोजी तिरंगा ध्वज भारताचा राष्ट्रध्वज म्हणून मान्य केला. भारतीय तिरंगा दिल्लीतील लाल किल्ल्यावर फडकताना पाहण्याची त्यांची इच्छा होती. मात्र त्यांच्या कुटुंबाकडे त्यांना दिल्लीला पाठवण्याइतके पैसे नसल्याने त्यांची ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. सन १९६३ साली पिंगली यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर काही दशकांनी सन २००९ साली भारतीय पोस्ट खात्याने त्यांच्या सन्मानार्थ पोस्टाचे तिकीट जारी केले. स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यासाठी हे तिकीट जारी करण्यात आले होते.

सन २०११ साली भारतरत्न पुरस्कारासाठी- मरणोत्तर पिंगली यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती. मागील काही वर्षांपासून त्यांच्या मुलीला सरकारकडून पेन्शन देण्यात येत आहे, हे विशेष उल्लेखनीय! भारताचा ध्वज कोणत्या रंगाचा असावा? त्यात किती आणि कोणते रंग असावेत? त्याचा आकार कसा असावा? आदी गोष्टींचा सखोल अभ्यास करून ज्यांनी तिरंगा साकारला. ते केवळ तिरंग्याचे निर्माते नव्हते तर जपानी भाषेचे शिक्षक, सिद्धहस्त लेखक आणि जिओफिजिसिस्टही होते.

ब्रिटीश भारत- सध्याचे आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील दिवी तालुक्यातील भटलापेन्नुमारू येथील हनुमंतरायुडू आणि वेंकटरत्नम्मा या दांपत्याच्या पोटी दि.२ ऑगस्ट १८७६ रोजी पिंगाली यांचा जन्म झाला. देशभक्तीने भारावलेल्या पिंगाली यांनी वयाच्या १९व्या वर्षी बोअर युद्धासाठी आपले नाव नोंदवले आणि ते सैन्यात भरती झाले. त्यानंतर आफ्रिकेत असताना त्यांची महात्मा गांधीजींशी भेट झाली आणि त्यांचे ऋणानुबंध जुळले. ते पुढे ५० वर्षे टिकून होते. भारतात परतल्यावर बंगलोर आणि मद्रास येथे त्यांनी रेल्वे गार्ड म्हणून काम केले आणि मग बेल्लारी येथील शासकीय सेवेत प्लेग अधिकारी म्हणून ते रुजू झाले. पण त्यांची देशभक्तीची आस त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. शिक्षणाच्या ओढीने त्यांनी थेट लाहोरमधील अँग्लोवेदिक महाविद्यालय गाठले आणि प्राध्यापक गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली जपानी भाषा आणि इतिहासाचे शिक्षण घेतले. पिंगाली यांनी स्वतःला नॅशनल स्कूलच्या विकासासाठी वाहून घेतले. या ठिकाणी प्राथमिक सैन्यप्रशिक्षण, घोडेस्वारी, इतिहास आणि शेतीविषयी प्रशिक्षण देण्यात येत असे. ते केवळ पुस्तकी ज्ञानाने समाधानी होणारे नव्हते. त्यांच्या दैनंदिन आचरणातून त्यांचा उदारमतवादीपणा दिसत असे. सन १९१४ मध्ये आपल्या शेतावर स्वेच्छापुरम ही संस्था स्थापन केली.

सन १९१६ ते १९२१ या कालावधीत पिंगाली यांनी सुमारे ३० ध्वजांचा अभ्यास करून त्यांनी भारतीय ध्वजाची कल्पना मांडली. आपल्या तिरंग्याच्या सध्याच्या रूपाचे डिझाईन तयार करण्याचे श्रेय पिंगाली यांना दिले जात असले तरी भारतीय ध्वजाची पाळेमुळे वंदे मातरम् चळवळी पर्यंत जातात. १ ऑगस्ट १९०६ रोजी कलकत्त्यातील पारसी बगान स्क्वेअर- ग्रीन पार्क येथे पहिले ध्वजारोहण झाले. हा ध्वजही तीन रंगांत होता. वरील भागात लाल, मध्ये पिवळा आणि खालच्या बाजूला हिरवा, अशी या ध्वजाची रंगसंगती होती. लाल भागात पांढऱ्या रंगाची आठ कमळाची फुले कोरलेली होती. पिवळ्या भागात निळ्या रंगाने देवनागरी लिपीत बंदे मातरम् असे लिहिले होते. मदाम कामा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सन १९०७ साली पॅरिसमध्ये ध्वजारोहण केले होते. या ध्वजाची रंगसंगतीही पहिल्या ध्वजाप्रमाणेच होती.

फरक एवढाच की, पहिल्या पट्टीमध्ये केवळ एकच कमळ होते आणि सप्तर्षी दर्शविणारे सात तारे होते. बर्लिनच्या समाजवादी बैठकीत हा ध्वज फडकविण्यात आला. सन १९१७ मध्ये जेव्हा राजकीय चळवळीने वेग घेतला, त्यावेळी अँनी बेझंट आणि लो.बाळ गंगाधर टिळक यांनी ध्वजारोहण केले होते. या ध्वजाच्या डाव्या बाजूच्या कोपऱ्यात युनियन जॅकचा शिक्का होता. त्याचप्रमाणे पांढऱ्या आकाराचे अर्धवर्तुळ आणि ताऱ्याचे चिन्ह होते.

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# अभिनेते देवेंद्र दोडके यांचा 'पद्मश्री मो. रफी अवॉर्ड'ने गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त मोहम्मद रफी फॅन्स कल्चरल ऑर्गनायझेशन, प्रगती एंटरप्रायझेस आणि एम.आर.के. संगीत समूह यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी श्री साई सभागृह, शंकरनगर येथे संगीतमय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते देवेंद्र दोडके यांना मान्यवरांच्या हस्ते यंदाचा 'पद्मश्री मो. रफी अवॉर्ड' प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमल किशोर फुटणे, सेंट पॉल स्कूलचे संचालक राजाभाऊ टांकसाळे, गेट्वेल हॉस्पिटल अँड रिसर्च इंस्टिट्यूट्स संचालक डॉ. राजेश स्वर्णकार, प्रगती एंटरप्राइजेस संचालक गौरव नासरे,वाघमारे मसालेचे प्रकाश वाघमारे, दिनेश बंग, कार्तिक अय्यर यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यानंतर सदाबहार गीतांचा कार्यक्रम 'सौ बार जनम लेंगे' सादर झाला. या कार्यक्रमात रफी, मुकेश आणि किशोर कुमार यांच्या लोकप्रिय गीतांची मैफल विनोद दुबे, रमेश अय्यर, राम खनगन, सरिता गडकरी, वैष्णवी सांबरे, सुधा हरिदासन, सुनील फुलझेले, जितेश बनोदे, समीर वझलवार आणि मोहम्मद सलीम यांनी सादर केली. त्यांनी ओ मेरी महेबूबा, जो तुमको हो पसंद वही बात, एक बेचारा प्यार का मारा, ए मेरे दिल हरदम दुआ कर, मैने तेरे लीये ही सात रंग के आदी गीते सादर केली.

## मो. रफींच्या अजरामर गीतांनी रंगली सुरेल

गायकांना नचिकेत देव, उल्हास चिटमुळीवार, नितीन अहिरे, अनिकेत दहिकर, सुरज मोगरे, प्रांजल गजुला या वादक कलाकारांनी उत्तमरित्या साथसंगत केली. कार्यक्रमाची संकल्पना राम खनगन यांची होती तर आयोजन रमेश अय्यर यांचे होते. प्रास्ताविक मोहम्मद सलीम यांनी तर सूत्रसंचालन प्रवीण देशकर यांनी केले.

**मनोरंजन करणे हेच नटाचे कर्तव्य : देवेंद्र दोडके**

आपल्या हक्काच्या घरातून आणि आप्तस्वकीयांकडून मिळालेली शाबासकी ही कोणत्याही कलावंतासाठी अत्यंत मोलाची व अभिमानास्पद असते. 'मोहम्मद रफी' हे केवळ नाव नसून एक अनमोल वारसा आहे, अशा महान गायकाच्या स्मृतीनिमित्त घरच्या माणसांकडून मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत मानाचा आहे", असे सत्काराला उत्तर देताना देवेंद्र दोडके म्हणाले.

नागपूर ते मुंबई आणि वयाच्या सहाव्या वर्षापासून सुरू झालेला बालकलाकार ते 'माज्या नवऱ्याची बायको' या प्रसिद्ध मालिकेतील यशस्वी नट असा हा प्रवास खडतर होता; मात्र झाडीपट्टी रंगभूमी आणि प्रेक्षकांच्या उदंड प्रेमाने मला खरी ओळख व ताकद दिली. कलावंताचे जीवन अनिश्चिततेने भरलेले असले आणि पाठीमागे कितीही वैयक्तिक संघर्ष सुरू असला, तरी मंचावर येऊन प्रेक्षकांचे प्रामाणिक मनोरंजन करणे हेच नटाचे खरे कर्तव्य असते, असे ते म्हणाले.

## पारशिवनी येथे समता सैनिक दलाच्या महिला शाखेचे उद्घाटन



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी पारशिवनी येथील रमाई बुद्ध विहार येथे समता सैनिक दल महिला शाखेचा स्थापना व नामफलक अनावरण सोहळा अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. नागपूर जिल्हा अध्यक्ष सुजाता ताई डबरासे, शाखा उदघाटन सोनिका ताई वाघमारे, मुख्य ट्रेनिंग कमाण्डर ध्वजपाल फुले,चंद्रकुमार बोरकर साहेब यांच्या विशेष प्रयत्नातून व मार्गदर्शनातून या महिला शाखेची निर्मिती करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचा प्रारंभ भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व वंदन करून करण्यात आला.त्यानंतर, समता सैनिक दल पारशिवनी महिला शाखेच्या नवनिर्मित नामफलकाचे (बॉर्डचे) उद्घाटन सैनिक सोनिका विशाल वाघमारे (कार्यकारी अध्यक्ष) यांच्या शुभहस्ते आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. नामफलक उद्घाटनाच्या प्रसंगी भव्य जागृती रॅली काढण्यात आली. निळ्या आणि पंचशील ध्वजांसह शिस्तबद्ध गणवेशात (सफेद साडी आणि निळा ब्लाउज/टोपी) समता सैनिक दलाच्या महिला सैनिकांनी रॅलीत सहभाग नोंदवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित, पीडित आणि अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी समता सैनिक दलाची (सन १९२७) स्थापना केली होती. समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, आपल्या हक्क-अधिकारांचे रक्षण करणे आणि समाजात शिस्त व बंधुभाव निर्माण करणे हे या दलाचे मूळ ध्येय आहे.

आज पारशिवनी येथे महिला शाखेची निर्मिती झाल्याने, महिलांचा सामाजिक सहभाग अधिक मजबूत होईल आणि समाजातील अन्यायाविरुद्ध लढा देण्यास नवी ताकद मिळेल असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या ऐतिहासिक प्रसंगी अनेक प्रमुख पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सैनिक सोनिका विशाल वाघमारे (शाखा उद्घाटक / कार्यकारी अध्यक्ष गणवीर सर, रणजित रंगारी, कल्याण अडकने, तसेच सुजाता डबरासे, संगीताताई वाकपांजर, रीना नदेश्वर, प्रतिभा दुपारे, करुणा नारनवरे,नयना भिमटेव इतर सर्व समता सैनिक महिला व पुरुष पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## ई-ऑफिस प्रणालीवरच टपालाचा स्वीकार

**लातूर :** लातूर जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांमध्ये गेल्या एक ते दिड वर्षापासून ई-ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. जिल्हा परिषदेत दाखल होणा-या फाईलींचा निपटारा हा सदर प्रणालीवरच होत आहे. १ जुलै पासून सर्व पंचायत समिती स्तरावरून येणारे ऑफलाईन टपाल आता ऑनलाईन ई-ऑफीस टपालाद्वारे जिल्हा परिषदेत स्विकारले जात आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेला फाईल घेऊन जाण्यासाठीचा वेळ वाचणार आहे. लातूर जिल्हा परिषदेने काळानुसार बदल स्विकारत सर्व विभागांमध्ये आता ई-ऑफिस प्रणाली लागू केली आहे. जिल्हा परिषदेत दररोज २०० च्यावर टापल, फाईली दाखल होतात. त्यासाठी विभागानुसार टपाल घेण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने सर्व खाते प्रमुख, विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांना जून मध्ये पत्र काढून कार्यालयीन कामकाजाचा निपटारा लवकर होण्यासाठी सर्व पत्रव्यवहार ऑनलाईन व ई-ऑफीसद्वारे करण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसेच जिल्हा परिषद स्तरावरून विभागीय आयुक्त कार्यालयास करण्यात येणारा पत्रव्यवहारही ई-ऑफीसद्वारेच करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गेल्या महिनाभरापासून ई-ऑफीसद्वारेच टपाल स्विकारल्या जात आहे. गोपनिय फाईल व काही फाईलचा अपवाद वगळता सर्व फाईल ई-ऑफीसद्वारेच स्विकारल्या जात आहेत.

## साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा : दिगांबर डोंगरे

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
आज साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती अण्णाभाऊ साठे नगरात बहुजन वंचित क्रांति सेनेच्या वतीने आयोजित करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष तथा न. प काटोलचे माजी सभापती दिगांबर डोंगरे होते.तर नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे, ज्येष्ठ आरपीआय नेते भीमरावजी बनसोड, संघटनेचे ज्येष्ठ नेते सुरेशराव देशभ्रतार, बहुजन वंचित क्रांति सेनेचे काटोल तालुका अध्यक्ष विजय दहाट, सामाजिक कार्यकर्ते हर्षद बनसोड, अण्णाभाऊ विचार मंचाचे अध्यक्ष संजय कावळे, आरपीआय सेक्युलर पक्षाचे अध्यक्ष कृष्णाजी गवईकर प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी दिगांबर डोंगरे भीमरावजी बनसोड नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे सुरेशराव देशभ्रतार, संजय



कावळे यांच्या हस्तेद्वीप प्रज्वलित करून माल्यार्पण करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांच्या नावाचा मोठया प्रमाणात जयघोष करण्यात आला.

यावेळी भीमरावजी बनसोड यांनी आपल्या कार्यकाळात या नगरीला अण्णाभाऊ साठे नगर नाव देऊन अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविल्याने काटोल शहराला वेगळी ओळख निर्माण झाल्याच सांगितले तर नगरसेविका प्रज्ञा डोंगरे यांनी या सभागृहात लवकरच अत्याधुनिक जिम व अभ्यासिका चालु करण्याचा निर्णय माजी नगराध्यक्ष राहुल देशमुख यांच्या नेतृत्वात तर नगराध्यक्षा अर्चनाताई देशमुख यांनी व प्रभागाचे नगरसेवक राजू अडागळे नगरसेविका जयश्री सावरकर यांच्या असलेल्या सततच्या मागणीचा विचार करून येणाऱ्या निर्णय घेतलेला आहे असे सांगितले.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात दिगांबर डोंगरे म्हणाले की खुप मोठे शिक्षण नसतानाही आपल्या लेखणीतून अनेक क्रांतिकारी विचार अण्णाभाऊंनी दिले की, ज्या विचाराच्या अनेक क्रांत्या झाल्या त्यांनी कादंबरी पोवाडे लोकगीत नाटके कथा यामधून माणसाला बळ देण्याचे काम केले. त्यांचे साता समुद्रापलीकडे अनेक देशांनी स्वीकारले भारताचे नाव साहित्यिक क्षेत्रात मोठे केले म्हणून अशा उच्चकोटीच्या व्यक्तीला भारतररत्न पुरस्कार द्यावा अशी मागणी दिगांबर डोंगरे यांनी केली आहे. सुरेशराव देशभ्रतार, संजय कावळे, हर्षद बनसोड, कृष्णा गवईकर, विजय दहाट यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला संचालन ललित चोखंद्रे तर प्रास्ताविक रिना बनसोड यांनी तर आभार बाबा तागडे यांनी केले.

यावेळी राजेंद्र बागडे, धनंजय ठोसर, ईश्वर गायकवाड, पुरुषोत्तम अडागळे, वैभव वानखेडे, मयुर गायकवाड, यश कावळे, सुमित अडागळे, सृष्टी बनसोड, साहिल दाते, अनावर शेख, सुरज अडागळे, नरेश वानखेडे, यश दहाट, समीर अडागळे यांच्यासह मोठया प्रमाणात कार्यकरते उपस्थित होते.

# सालई शिवारात वाघाचा ठिय्या, रानडुकराची शिकार शेतकरी भयभीत, वन विभागाला पिंजरा लावण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
पारशिवनी वनपरिक्षेत्र हद्दीतील सालई (माहूली) शिवारात शनिवारी सकाळी झुडपात वाघाचा ठिय्या असल्याचे शेतकऱ्यांच्या निदर्शनास आले. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सालई (मा) ते आमगाव, बाभुळवाडा शिवारात वाघाचे भ्रमण तसेच मानवी व पशु शिकार हा नवीन विषय नाही. मागील काही दिवसांपासून वाघाचे भ्रमण कमी झाले होते. मात्र शनिवारी सकाळीच वाघ



झूडपात बसून असल्याचे प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी पाहिले. या परिसरात या पुर्वी मानवी व अनेक पशुधन शिकार सुद्धा झाली आहे. त्यामुळे अगोदरच वाघाचे दहशतमय क्षेत्र म्हणून ओळख आहे. आणि शनिवारी वाघ दिसताच परिसरात बातमी पसरली आणि एकच खळबळ उडाली. शेतकरी काम अर्धवट सोडून घरी परतले.हि माहिती वन विभागाला देण्यात आली.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपला ताफा दाखल केला. नंतर पोलीस दल ही दाखल होऊन स्थळ पाहणी केली. तर वाघाचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी जमली. वाघाने रान डुकरची शिकार केली असल्याने तो झुडपात ठिय्या धरून बसला होता. तो काही केल्या जागा सोडायला तयार नव्हता. वन विभागा कडे पुरेशी यंत्रणा व परवानगी नसल्याने वाघाला हाकलून लावल्या शिवाय पर्याय उरला नाही. त्यामुळे त्याला उशिरा हाकलून लावण्यात यश आले. एकट्याने जंगलात किंवा शेतात न जाण्याचे तसेच सतर्क राहण्याचे आवाहन वन विभागाने केले आहे. तसेच जनावरांना मोकळे न सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून या भागात वाघाच्या दर्शनामुळे शेतकरी दहशतीखाली जगत आहेत. वन विभागाने तातडीने पिंजरा लावून वाघाला जंगलात सोडावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## थोडक्यात

### प्रनाग हायस्कूल आजनगाव येथे शालेय मंत्रीमंडळासाठी लोकशाही पद्धतीने निवडणूक



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
विद्यार्थ्यांच्या बौद्धिक,सांस्कृतिक व शारीरिक सर्वांगीण विकास साधण्यासाठी आनंददायी शनिवार उपक्रम राबविण्यात मौदा तालुक्यात प्रसिद्ध असलेल्या प्रणाग हायस्कूल आजनगाव येथे या शनिवार (१ ऑगस्ट) ला लोकशाही पद्धतीने शालेय मंत्रिमंडळाच्या निवडीसाठी भारतीय लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली. लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाचा घटक, लोकशाहीचा आत्मा म्हणजे पारदर्शी निवडणूक पद्धत यांची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, निवडणुकीची कार्य पद्धतीचे ज्ञान मिळावे, विद्यार्थ्यांना राज्यशास्त्र व नागरिक शास्त्र या विषयाची प्रात्यक्षिक माहिती व्हावी तसेच राजकीय निवडप्रक्रिया, कार्यपद्धती इ. ची माहिती मिळावी ही बाब लक्षात घेऊन प्रतिवर्षी शाळेत हा उपक्रम राबवला जातो.

विद्यार्थी स्वपसंतीने शाळा प्रमुखासह शालेय मंत्रिमंडळाची निवड करतात. ही निवडणूक मतपत्रिकेद्वारे घेण्यात आली. तसेच यासह प्रनाग शाळेतील विद्यार्थी बँकेच्या प्रतिनिधीची सुद्धा निवड करण्यात आली. विद्यार्थी बँकेचे कामकाज विद्यार्थ्यांसह कार्यवाह म्हणून शिक्षक गुणरत्न गजभिये यांनी पार पाडले. तर शालेय सार्वत्रिक निवडणूक २०२६-२७ हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक कु. बाबुलकर, शिक्षक सुरेश टांगले, राजू गेडाम, गुनरत्न गजभिये, लिपिक सुनील डोंगरे, मदतनीस क्षिरसागर परिश्रम घेतले.

### ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ कृष्णराव (मधुकरराव) तिजारे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
हनुमान नगर, नागपूर येथील कृष्णराव (मधुकरराव) तिजारे सी.पी.अँड बेरार हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे सेवानिवृत्त



प्राचार्य, राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी तसेच महात्मा फुले शिक्षण संस्थेचे माजी सचिव श्री कृष्णराव (मधुकरराव) मारोतराव तिजारे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९० व्या वर्षी राहत्या घरी दुःखद निधन झाले. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कायामुळे त्यांनी शिक्षक, विद्यार्थी आणि समाजात आदराचे स्थान मिळविले होते. त्यांच्या निधनामुळे शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, नातवंडे तसेच मोठा आप्तपरिवार आहे. मोक्षधाम घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### डासांना चाप, साथीच्या आजारांना आळा!

**सरपंच नंदू चरपे यांच्या पुढाकाराने मेंढला ग्रामपंचायतीची गावभर फॉगिंग मोहीम**



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचा वाढता धोका लक्षात घेऊन सरपंच नंदू चरपे यांच्या मार्गदर्शनाखाली मेंढला ग्रामपंचायतीच्यावतीने संपूर्ण गावात डासनाशक फॉगिंग फवारणी मोहीम राबविण्यात आली. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि डासांच्या प्रादुभार्वावर नियंत्रण मिळविण्यासाठी ग्रामपंचायतीने ही मोहीम युद्धपातळीवर हाती घेतली. गावातील मुख्य रस्ते, गल्ली-बोळ, सार्वजनिक ठिकाणे, नाल्यांच्या परिसरासह डासांची पैदास होण्याची शक्यता असलेल्या सर्व भागात फॉगिंग करण्यात आले.

यासोबतच ग्रामपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून परिसर स्वच्छ ठेवणे, साचलेले पाणी हटविणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे कामही करण्यात आले. सरपंच नंदू चरपे यांनी नागरिकांना आवाहन करताना घर व परिसर स्वच्छ ठेवावा, पाण्याची भांडी झाकून ठेवावीत, घराजवळ पाणी साचू देऊ नये आणि ताप, अंगदुखी किंवा डेंग्यूसदृश लक्षणे आढळल्यास तातडीने आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत, असे सांगितले. ग्रामपंचायतीकडून पुढील काही दिवसांतही आवश्यकतेनुसार फॉगिंग फवारणी सुरू ठेवण्यात येणार असून, "स्वच्छ, निरोगी आणि डासमुक्त मेंढला" हा संकल्प पूर्ण करण्यासाठी नागरिकांनी ग्रामपंचायतीला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामस्थांनीही सरपंच नंदू चरपे यांच्या पुढाकाराचे स्वागत करत, साथीच्या आजारांपासून बचावासाठी ग्रामपंचायतीने वेळेवर उचललेले हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असल्याची भावना व्यक्त केली. अशी लोकाभिमुख आरोग्य मोहीम राबविल्याने ग्रामपंचायतीच्या कार्याबद्दल नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

### रेलिंग तुटून दोन पर्यटक दरीत कोसळले

**पालघर :** सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहे. काही ठिकाणी चांगला पाऊस पडत आहे. त्यामुळं या काळात मोठ्या प्रमाणात पर्यटक फिरायला जात असतात. अशातच पालघर जिल्ह्यातील जव्हार येथील प्रसिद्ध दाभोसा धबधब्यावर आज मोठी दुर्घटना टळली. जुनाट लोखंडी रेलिंग तुटल्याने दोन पर्यटक दरीत कोसळल्याची घटना घडली. यावेळी उपस्थित पर्यटक आणि वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने बचावकार्य करुन दोघांचे प्राण वाचवलेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. या घटनेनंतर धबधबा परिसरातील गंजलेले रेलिंग आणि अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

थोडक्यात

## पूर्व विदर्भातून काँग्रेसच्या 'मंडल यात्रा'ला ७ ऑगस्टपासून प्रारंभ




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागातर्फे "हर एक ओबीसी बनेगा काँग्रेसी" या घोषवाक्यासह आयोजित राज्यव्यापी 'मंडल यात्रा' पूर्व विदर्भात ७ ते ११ ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आला आहेत. या यात्रेचा शुभारंभ ७ ऑगस्ट रोजी, सकाळी १० वाजता. नागपूरच्या संविधान चौकातून होणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. यशपाल भिंगे यांनी पत्रकार परिषदेत दिली. ही यात्रा नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा या सहा जिल्ह्यांतील ६३ तालुके, ३२ विधानसभा व ६ लोकसभा मतदारसंघांमधून प्रवास करणार आहे. यात्रेदरम्यान जनसंवाद, कार्यकर्ता मेळावे, पत्रकार परिषद, संविधान जनजागृती कार्यक्रम आणि जाहीर सभांचे आयोजन करण्यात येणार आहे.

जातनिहाय जनगणना, ओबीसी आरक्षणाचे संरक्षण, सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि राजकीय प्रतिनिधित्व या विषयांवर जनजागृती करण्यावर यात्रेचा भर राहणार असून, काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि हजारो कार्यकर्ते यात सहभागी होणार आहेत. यावेळी पत्रपरिषदेला गिरीश पांडव, अतुल लोंढे, अजय हटेवार, मोरेश्वर भादे, प्रा. अवंतिका लेकुरवाळे, भूषण तल्हार, प्रशांत आस्कर, प्रशांत पवार, रमेश कारामोरे, उमाकांत धांडे, मनोज ढोरे, श्रीकांत येरपुडे, जीवन कावळे यांच्यासह प्रदेश व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

## बीएलओकडून "मतदार गणना प्रपत्र" फॉर्म प्रत मिळत नसल्याची एसडीओकडे तक्रार

### आमदार संजय मेश्राम यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे केली मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यात विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एस आय आर) २०२६ अंतर्गत सुरू असलेल्या मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत नागरिकांना बी एल ओ मार्फत भरून घेतलेल्या "मतदार गणना प्रपत्र" ची प्रत उपलब्ध करून दिली जात नसल्याची गंभीर तक्रार आमदार संजय मेश्राम यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी उपविभागीय अधिकारी, उमरेड यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. निवेदनात आमदार मेश्राम यांनी म्हटले आहे की, अस आय आर -२०२६ अंतर्गत बी एल ओ घराघरांत जाऊन नागरिकांकडून "मतदार गणना प्रपत्र" फॉर्म भरून घेत आहेत. मात्र, भरलेला फॉर्म नागरिकांच्या नोंदीसाठी त्यांना दिला जात नसल्याने अनेक नागरिकांनी याबाबत तक्रारी केल्या आहेत. भविष्यात पडताळणी किंवा कोणताही वाद उद्भवल्यास नागरिकांकडे त्यांनी भरलेल्या माहितीचा कोणताही पुरावा राहणार नाही, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यात बी एल ओ यांनी भरून घेतलेल्या प्रत्येक "मतदार गणना प्रपत्र" फॉर्म ची एक प्रत संबंधित नागरिकांना उपलब्ध करून देण्यात यावी, तसेच आवश्यक असल्यास घरपोच प्रत देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी आमदार संजय मेश्राम यांनी प्रशासनाकडे केली आहे. मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत पारदर्शकता राहावी, नागरिकांकडे त्यांच्या नोंदीचा अधिकृत पुरावा असावा आणि भविष्यात कोणताही गैरसमज किंवा वाद निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने त्वरित योग्य निर्देश द्यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती प्रेरणादायी वातावरणात साजरी

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

भानेगाव येथील संत रविदास सभागृहात मातंग समाजाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. समाजातील विविध



घटकांची उपस्थिती आणि प्रेरणादायी विचारांनी कार्यक्रमाला विशेष स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत रविदास यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यानंतर उपस्थितांनी त्यांच्या कायार्चा गौरव करत सामाजिक समतेचा संदेश देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शालिनी चवरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. राहुल हिरवाळे, सेल्स टॅक्स निरीक्षक प्रविण शेंडे, राजू साळवे, संजय ठोसर, शामराव सरोदे, सुनील जालंदर, मुकेश नायडू, अरविंद तांडेकर तसेच रील स्टार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कायार्चा आढावा घेत त्यांच्या लेखणीतून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाचे वास्तव प्रभावीपणे जगासमोर आले, असे मत व्यक्त केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम आणि सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यातील त्यांच्या योगदानाचाही गौरव करण्यात आला. तरुणांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, युवक-युवती आणि मातंग समाजातील मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती उत्साहात साजरी केली.

# राज्यपालांच्या हस्ते वृक्षारोपणाच्या महाअभियानाला प्रारंभ

### राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते लोकभवन परिसरात वृक्षारोपण, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पर्यावरण संवधार्नासह नागपूरला हिरव्या आच्छादनाने संपन्न करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण महाअभियानाचा शुभारंभ राज्याचे माननीय राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते करण्यात आला.

सदर स्थित लोक भवन परिसरात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यासह कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महापौर निता ठाकरे, राज्यसभा सदस्य खा. माया इवनाते आमदार मोहन मते, आ. प्रवीण दटके, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्षनेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, नासुप्र सभापती संजय मीना, मनपा आयुक्त डॉ. विपीन,




प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. श्रीनिवास राव, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, मॉईलचे सीएमडी विश्वनाथ सुरेश, वेकोलीचे सीएमडी हेमंत पांडे, ग्रीन फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश वटे यांच्यासह इतर मान्यवरांनी हस्ते वृक्षारोपण केले. अभियानांतर्गत लोकभवन परिसरात १० हजार वृक्षांचे वृक्षारोपण केले जाणार आहे.

नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा प्रशासन, नागपूर जिल्हा परिषद, वन विभाग व ग्रीन फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरासह जिल्ह्यात १ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येणाऱ्या अभियानांतर्गत शहरात ५ लक्ष व जिल्ह्यात ५ लक्ष असे एकूण १० लक्ष वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

याचाच शुभारंभ भागातील लोकभवनात येथे झाला. याप्रसंगी डीसीएफ नागपूर डॉ. विनिता व्यास, डॉ. भारतसिंह हाडे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगनंथम एम, मिलिंद मेश्राम, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण माहिरे, सुरेश बगळे, नगरसेविका दर्शनी धवड, मंगला खेकरे, लक्ष्मी यादव, दिव्या धुरडे, संतोषदेवी लढ्ढा, धनश्री देशपांडे, योगिता तेलंग, पूजा पाठक, नगरसेवक सर्वश्री. श्रीकांत आगलावे, रितेश गावंडे,विजय होले, अभिजीत झा, ग्रीन फाउंडेशनचे सचिव निशांत गांधी, मनपाचे उपायुक्त सर्वश्री. गणेश राठोड, अमोल चोरपगार, अधिकारी प्रशांत सोनकुसळे, संजय गुजर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागपूर शहराला सुंदर व हरित साकारण्यासाठी प्रशासनाला विविध संस्थांचे सहकार्य लाभले आहे. वृक्षारोपणासाठी वन विभागाद्वारे ५ लाख वृक्ष दिले जाणार आहे. तर रायसोनी समूहातर्फे १ लाख वृक्ष दिले जाणार असून, पर्यावरण तज्ञ डॉ. चिंचमालतपुरे यांच्याकडून ५० हजार वृक्ष, व मॉईलचे आणि वेकोली यांच्या अर्थसहाय्य मिळणार आहे. नागरिकांनी देखील या महाअभियानात मोठ्या संख्येत सहभागी व्हावे असे आवाहन प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे.

**अभियानांतर्गत या झाडांची होणार लागवड**

लोक भवन परिसरात वड, उंबर, पिंपळ, बेल, चिंच, कडूनिंब, कदंब, खिरणी, बकुळ, कवठ, आवळा, महुआ, जांभूळ, आंबा, चिकू, अंजीर, अमलतास, बोर, काटसावर, करंजी, पळस, जारूळ. आपटा, महारुख, शिरीष,सिसम, आजन, अर्जुन असे वृक्ष लावण्यात येणार आहे.

## समाजाच्या आरोग्याचा आरसा दाखविणाऱ्या पत्रकारांच्या आरोग्याचीही काळजी

### टिळक पत्रकार भवन ट्रस्टच्या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद, दोनशेपेक्षा जास्त जणांची तपासणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

समाजातील अन्याय, आजार, समस्या आणि वेदना जगासमोर आणण्यासाठी अहोरात्र धावणाऱ्या पत्रकारांच्या स्वतःच्या आरोग्याकडे मात्र अनेकदा दुर्लक्ष होते. बातमीच्या शोधात दिवस-रात्र धावणाऱ्या आणि समाजाच्या आरोग्याचा आरसा दाखविणाऱ्या पत्रकारांच्या आरोग्याचीही काळजी घेण्याची गरज असते. ती अधोरेखित करणारे चित्र रविवारी नागपुरात पाहायला मिळाले.

टिळक पत्रकार भवन ट्रस्ट आणि प्रेस क्लबच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य शिबिरात दोनशेहून अधिक पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध आजारांची तपासणी, अत्याधुनिक वैद्यकीय चाचण्या, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि



आवश्यक औषधोपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आल्याने शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोमलवाडा, उज्ज्वल नगर येथील गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी आरोग्य तपासणीसाठी गर्दी केली होती. धावपळीच्या पत्रकारितेमुळे नियमित आरोग्य तपासणीला वेळ न मिळणाऱ्या अनेक पत्रकारांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शिबिराचे उदघाटन सेंटरचे अध्यक्ष व माजी आमदार संदीप जोशी, टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीपकुमार मैत्र, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे आणि नागपूर विभागाचे माहिती आयुक्त गजानन निमदेव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. यावेळी माहिती अधिकारी अनिल गडेकर, विनोद देशमुख, शिरीष बोरकर, अनुपम सोनी, प्रभाकर दुपारे, भुपेंद्र गणवीर, महेश उपदेव, धर्मेंद्र जोरे, शेखर सोनी, एस.एन. विनोद, चंद्रकांत उर्फ सनी शेंडे व रणजीत देशमुख यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. आरोग्य शिबिरात नेत्ररोग, अस्थिव्यंग, हृदयरोग, मेंदूरोग, बालरोग, मूत्ररोग, कान-नाक-घसा, स्त्रीरोग, त्वचारोग, मानसिक आरोग्य, क्षयरोग, श्वसनाचे विकार, ग्रंथीचे विकार, दंतरोग आणि कर्करोग यांसह विविध आजारांची तपासणी करण्यात आली. पत्रकारांच्या कुटुंबीयांसाठीही विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असल्याने अनेकांनी आपल्या आरोग्य विषयक तक्रारींची तपासणी करून घेतली. विशेष म्हणजे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रक्ताच्या विविध तपासण्या, क्ष-किरण, सोनोग्राफी, सीटी स्कॅन, एमआरआय, अँजिओग्राफी, ईसीजी, ईएमजी, २ डी इको, मॅमोग्राफी, बीएमडी आणि पीएफटी यांसारख्या अत्याधुनिक तपासण्याही मोफत करण्यात आल्या.

तपासणी दरम्यान आढळलेल्या आरोग्य विषयक समस्यांबाबत तज्ज्ञ डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले. आवश्यक औषधोपचारही करण्यात आले. या शिबिरासाठी एम्स तसेच गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरमधील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. विविध वैद्यकीय विभागांतील तज्ज्ञांनी पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांची तपासणी करून आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी लिहिणे नव्हे, तर समाजाच्या जखमांवर प्रकाश टाकण्याचे काम आहे.

जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरणारा, रुग्णालयापासून विधानसभेपर्यंत आणि गावखेड्यापासून मंत्रालयापर्यंत धावणारा पत्रकार स्वतःच्या आरोग्यासाठी मात्र वेळ काढू शकत नाही. त्यामुळे पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित हे शिबिर वैद्यकीय तपासणीपुरते मर्यादित न राहता पत्रकारांच्या आरोग्याप्रती समाजाची आणि पत्रकार संघटनांची जबाबदारी अधोरेखित करणारे ठरले. त्याची सुरूवात उपराजधानीत झाली. हे शिबीर दरवर्षी व्हावे अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली. आरोग्याची वेळेवर तपासणी झाली तर अनेक गंभीर आजारांवर सुरुवातीलाच नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे अशा शिबिरांची सातत्याने गरज असून, पत्रकारांच्या आरोग्याला पत्रकारितेइतकेच महत्त्व देण्याचा संदेश या उपक्रमातून मिळाला. एम्सच्या डॉक्टर चमूत डॉ. अंकिता चव्हाण, डॉ. गौत्तम, डॉ.अथर्व डांगे, डॉ.पूर्वा देशमुख, डॉ. रश्मी ठाकूर, डॉ. प्राची दीक्षित, डॉ. अंकिता कोल्हे, डॉ.निकिता राज डॉ. वेंकट रेड्डी, डॉ. श्री थोते आदी विविध विभागांचे डॉक्टर होते.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागरिकांच्या तक्रारी व निवेदनांवर प्रशासनाकडून थेट सुनावणी आणि तत्काळ कार्यवाही करण्याच्या उद्देशाने जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ ते २ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती सभागृहात करण्यात आले आहे. लोकशाही दिनासाठी नागरिकांकडून ३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत तक्रार अर्ज व निवेदने स्वीकारण्यात येणार आहेत. तक्रार अर्ज सादर केलेल्या नागरिकांनी लोकशाही दिनात व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

लोकशाही दिनात सादर करण्यात येणारे तक्रार अर्ज किंवा निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. तसेच, संबंधित तक्रारीवर तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज सादर करूनही एका महिन्याच्या कालावधीत कार्यवाही न झाल्यासच जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्ज सादर करता येईल. अशा वेळी तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांक नमूद करणे बंधनकारक राहील.

दरम्यान, नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यांच्या कार्यक्षेत्रातील तक्रारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनात स्वीकारल्या जाणार नाहीत. या संस्थांकडून त्यांच्या कार्यालयात स्वतंत्र लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत असल्याने संबंधित तक्रारी तेथेच सादर कराव्यात, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### कर्मयोगी डॉ. भाऊसाहेब भोगे यांना 'जीवन साधना पुरस्कार'


## समाजसेवेच्या कार्याला विद्यापीठाचा सर्वोच्च गौरव, परिसरात आनंदोत्सव

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

समाजसेवा, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकास क्षेत्रात उल्लेखनीय व दीर्घकालीन योगदान देणारे कर्मयोगी डॉ. भाऊसाहेब भोगे यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या 'जीवन साधना पुरस्कार' साठी निवड झाल्याची घोषणा होताच काटोलसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

समर्थक, हितचिंतक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. भाऊसाहेब भोगे यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील वंचित, गरीब, शेतकरी आणि गरजू घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केले आहे. शिक्षणाचा प्रसार, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा, ग्रामीण विकास, सामाजिक प्रबोधन आणि संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात



आलेल्या विविध उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांना नवी दिशा मिळाली असून अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य उज्ज्वल झाले आहे.

डॉ. भोगे यांच्या प्रेरणेतून उभ्या राहिलेल्या शैक्षणिक व सामाजिक संस्था आजही सेवा, संस्कार, गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकीचे केंद्र म्हणून कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावणे, आरोग्यविषयक जनजागृती, गरजू विद्यार्थ्यांना मदत, सामाजिक सलोखा आणि लोककल्याणाची भावना जपत त्यांनी केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे. मोठ्या पदावर कार्यरत असूनही डॉ. भाऊसाहेब भोगे यांनी साधेपणा, विनम्रता आणि सर्वसामान्यांशी असलेला जिव्हाळा कायम ठेवला आहे. प्रत्येक व्यक्तीला आपलेसे मानणारा त्यांचा स्वभाव आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या मते, 'जीवन साधना पुरस्कार' हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून सेवा, त्याग, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित जीवनकार्याचा गौरव आहे. डॉ. भाऊसाहेब भोगे यांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असून समाजहितासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येकासाठी ते मार्गदर्शक ठरत आहेत.

पुरस्काराची घोषणा होताच काटोल, नरखेड व परिसरातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांनी तसेच नागरिकांनी डॉ. भाऊसाहेब भोगे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या उत्तम आरोग्य, दीघार्युष्य आणि समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक होत राहावे, अशा शुभेच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्प अभियानाचा शुभारंभ

### मुख्यमंत्री फडणवीस यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्प अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रामगिरी येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती होती. विकसित भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करताना व्यसनमुक्त, निरोगी आणि सक्षम युवा शक्ती घडविण्याचा संकल्प या अभियानाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला आहे . युवकांनी अमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहून शिक्षण, कौशल्य, क्रीडा आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांनी व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. व्यसनमुक्त भारत आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, पालक, स्वयंसेवी संस्था आणि समाजातील सर्व घटकांनी समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' हे अभियान युवकांमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती निर्माण करून त्यांना सकारात्मक, निरोगी आणि जबाबदार जीवनशैलीकडे प्रेरित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आले आहे.

थोडक्यात

## "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा जागर, मोवाडमध्ये जयंती उत्साहात, समतेचा संदेश घुमला"

**'शब्दांनी चेतवली क्रांती, विचारांनी घडवला समाज' : संदीप खडसे यांचे प्रतिपादन; समाजप्रबोधनाच्या विचारांना उजाळा**



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

साहित्य, शाहिरी आणि सामाजिक परिवर्तनाची अखंड मशाल प्रज्वलित करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त नरखेड तालुक्यातील मोवाड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला. अण्णाभाऊ साठे स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांच्या क्रांतिकारी विचारांना अभिवादन करण्यात आले. यावेळी सामाजिक समता, बंधुता आणि संविधानिक मूल्ये जपण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याधिकारी अमोल परिहार होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष दर्शना ढोरे, नगरसेवक ललित खंडेलवाल, अंकुश घावडे, विवेक लिखार, राहुफ दिवाण, प्रणाली गजबे, मीनाक्षी बेले, वर्षा नासरे, लक्ष्मीनारायण निमकर, इस्माईल बारुदवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कायार्ला अभिवादन केले.

यावेळी वक्त्यांनी सांगितले की, अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील शोषित, वंचित, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या व्यथा जगासमोर मांडल्या. त्यांनी सामाजिक विषमता, अन्याय आणि अंधश्रद्धेविरुद्ध शब्दांचे प्रभावी शस्त्र उगारत समाजात परिवर्तनाची चळवळ उभी केली. त्यांच्या साहित्याचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. शेंदुर्जनाघाटचे नगरसेवक संदीप खडसे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी शब्दांनी क्रांती चेतवली आणि विचारांनी समाज घडवला. त्यांनी लेखणी आणि कलेच्या माध्यमातून वंचितांच्या वेदनांना वाचा फोडली. त्यांचे साहित्य हे केवळ वाचनासाठी नसून समाज परिवर्तनाची प्रेरणा देणारे आंदोलन आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे." यावेळी युवकांना शिक्षण, संघटन आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास करून समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये समाजात रुजविण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानावर आधारित मनोगते व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संघटन, मोवाड शहर मांग (मातंग) समाज यांच्या वतीने करण्यात आले. समाजबांधव, महिला, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अण्णाभाऊ साठे यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आणि अखेर सर्वांनी सामाजिक ऐक्य व समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला.

## उत्तम वक्तृत्वातून घडत असते व्यक्तिमत्व

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विद्यार्थ्यांशी संवाद**




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वक्तृत्व ही तांत्रिक बाब नाही. ते कौशल्य आहे. अभ्यासातून, अनुभवातून, वाचनातून हे कौशल्य विकसित करता येते. उत्तम वक्तृत्वातून आपले व्यक्तिमत्वही घडत असते, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. डीपीएस स्कुल लावा यांच्या वतीने आयोजित अदालत या उपक्रमाला गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शालेय जीवनातील आठवण सांगताना गडकरी म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्याला २५ वर्षे झाल्याच्या निमित्ताने आमच्या शाळेत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यात वक्तृत्व स्पर्धाही घेण्यात आली. एक स्पर्धक भाषण देताना मध्येच अडखळला. त्यावर आम्ही पाणी पी असे त्याला चिडवले. शिक्षकांनी आमच्या वागणुकीसाठी शिक्षा दिली आणि किमान त्याने पुढे येऊन भाषण देण्याची हिंमत तरी दाखवली, तुमच्यात तर तेवढीही हिंमत नाही, या शब्दांत आम्हाला रागवले सुद्धा. त्यानंतर मी सुद्धा जिद्दीने वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घेऊ लागलो आणि पुढे विद्यापीठाचे सुवर्णपदक देखील पटकावले. शिक्षकांनी रागवले नसते तर कदाचित वक्तृत्व विकसित झाले नसते. त्यामुळे मिळालेल्या संधीचे सोने करा, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यांना ते पुढे म्हणाले, ह्यकुणीही परफेक्ट नाही. प्रत्येकजण आयुष्यभर विद्यार्थी असतो. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर काहीतरी नवीन शिकत असतो.

संवाद, वादविवाद, वक्तृत्व हे कौशल्य आहे आणि प्रसंगावधान राखून त्यात योग्य शब्द, भाषा वापरत आपले कौशल्य सिद्ध करणे, ही मोठी प्रक्रिया आहे. त्यामुळे आपल्या भाषणांमध्ये इतरांच्या कविता, शेरो-शायरीचा आधार घेण्याचे टाळा. कमी शब्दांमध्ये आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करा, असा सल्लाही गडकरी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

# शैक्षणिक संस्थांनी कालसुसंगत मनुष्यबळ घडविण्यावर भर द्यावा : मुख्यमंत्री

**रामदेवबाबा विद्यापीठातील एआय सेंटर फॉर कॉम्पिटन्सीचे उद्घाटन**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शैक्षणिक संस्थांनी आता नोकऱ्यांच्या क्षेत्रातील गरजा लक्षात घेऊन रोजगारक्षम, अत्याधुनिक कौशल्यांनी सज्ज, कालसुसंगत मनुष्यबळ घडविण्यावर भर दिला पाहिजे. आजच्या नोकऱ्यांच्या क्षेत्राला केवळ पदवीधरांची गरज नाही, तर अर्थपूर्ण योगदान देणाऱ्या गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलताना केले.

रामदेवबाबा विद्यापीठातील एआय सेंटर फॉर कॉम्पिटन्सीच्या उद्घाटन समारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. याप्रसंगी श्रीरामदेवबाबा सार्वजनिक समितीचे अध्यक्ष पद्मश्री सत्यनारायण नुवाल, उपाध्यक्ष एस. राठी, पी. पालडीवाल, महासचिव राजेंद्र पुरोहित, सचिव ॲड प्रदीप अग्रवाल, कैलाशचंद्र अग्रवाल, कोषाध्यक्ष अशोककुमार पचेरीवाला, विद्यापीठाचे कुलपती डॉ. एस.एस. मंथा, कुलगुरु डॉ. आर.एस. पांडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, देशातील एक अग्रणी शैक्षणिक संस्था म्हणून रामदेवबाबा व्दियापीठाने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिक्षणाच्या मूळ उद्देशांशी स्वतःला जोडून ठेवत व्यापारीकरणापासून दूर राहण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. खाजगी संस्था असूनही देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांमध्ये तिचा समावेश होतो. आज या संस्थेचे विद्यापीठात रूपांतर झाले आहे. संशोधनाच्या क्षेत्रात तसेच शिक्षणाला नवा आकार देणाऱ्या देशातील अत्यंत नामांकित विद्यापीठांमध्ये या विद्यापीठाचा समावेश होईल, असा विश्वास असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमिकॉन आणि क्वांटम कम्प्युटिंग तंत्रज्ञान हे या शतकाच्या भविष्याला आकार देणारे प्रमुख घटक ठरणार आहेत. औद्योगिक क्रांतीचा विचार केला तर पहिल्या औद्योगिक क्रांतीला १७४० च्या सुमारास, दुसरी १८६० च्या सुमारास आणि तिसऱ्या क्रांतीला १९५० च्या सुमारास सुरूवात झाली होती. तंत्रज्ञानातील वेगवान बदलांमुळे आज २०२६ मध्ये आपण पाचव्या औद्योगिक क्रांतीची चर्चा करीत आहोत. ही क्रांती कृत्रिम बुद्धिमत्ता, डीप टेक्नॉलॉजी आणि फ्रंटियर टेक्नॉलॉजीवर आधारित आहे. आता जगाने सहाव्या औद्योगिक क्रांतीची चर्चा देखील सुरू केली आहे, याकडे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी लक्ष वेधले.

ज्या प्रचंड वेगाने तंत्रज्ञान तसेच व्यवसायाचे स्वरूप बदलत आहे, ते लक्षात घेता आपल्या शैक्षणिक संस्थांनी नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे आवश्यक आहे. बराच काळ आपण सीपीयूची चर्चा करीत होतो, आता जीपीयूची चर्चा करीत आहोत.

क्वांटम कम्प्युटिंगमुळे संशोधन प्रक्रियेला अभूतपूर्व गती मिळाली आहे. बायोटेक्नॉलॉजी, रोबोटिक्स असो किंवा इतर कोणतेही क्षेत्र असो, तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन घडत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे येत्या एक हजार दिवसांत नोकऱ्यांच्या क्षेत्रातील सुमारे ७० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप आमूलाग्र बदलणार आहे. नोकऱ्या कमी होणार नाहीत, मात्र त्यांचे स्वरूप निश्चितच बदलेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे हा बदल अटळ आहे. त्यामुळे जग ज्या वेगाने बदलत आहे, त्या वेगाशी सुसंगत राहण्यासाठी आपल्या शिक्षण संस्थांनाही शिक्षणाच्या पद्धतीत बदल करावे लागतील, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे आरोग्यसेवा क्षेत्रातही व्यापक बदल घडत आहेत. रोगांच्या व्यवस्थापनात आमूलाग्र बदल झाले आहेत. आपल्या अर्थव्यवस्थेचा पाया असलेले कृषी क्षेत्र हे कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वाधिक लाभ होणाऱ्या क्षेत्रांपैकी एक आहे. अलिकडेच राज्य सरकारने 'महाविस्तार' हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ॲप सुरू केले असून ते पूर्णपणे कृषी क्षेत्राला समर्पित आहे. कोणताही शेतकरी आपल्या भाषेत प्रश्न विचारून पिकांवरील कीड, खतांचे व्यवस्थापन, पीक व्यवस्थापन किंवा इतर कोणत्याही समस्येबाबत माहिती मिळवू शकतो. पिकाचा साधा फोटो अपलोड केल्यानंतर कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल त्या पिकाची सद्यस्थिती, भविष्यातील संभाव्य समस्या आणि आवश्यक व्यवस्थापनाबाबत सविस्तर माहिती देऊ शकते. या तंत्रज्ञानामुळे शेतीचा उत्पादन खर्च सुमारे २५ टक्क्यांनी कमी होऊ शकतो, तर उत्पादकता २५ ते ३० टक्क्यांनी वाढू शकते. हीच कृत्रिम बुद्धिमत्तेची खरी ताकद आहे.

आज कोणतेही क्षेत्र एका चौकटीत राहिलेले नाही. अभियांत्रिकी असो, बायोटेक्नॉलॉजी असो किंवा इतर कोणतीही शाखा, आता स्वतंत्रपणे शिक्षण घेऊन चालणार नाही. बहुविषयक दृष्टिकोन स्वीकारणे काळाची गरज बनली आहे. जगाचा इतिहास पाहिला तर मोठ्या नवकल्पना उद्योगक्षेत्रातून नव्हे, तर विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांमधूनच उदयास आल्या आहेत. आज तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज म्हणून ज्यांच्याकडे आपण पाहतो, त्यांची वाटचालही एखाद्या विद्यापीठातून किंवा संशोधन संस्थेतूनच सुरू झाली आहे. त्यामुळे ज्ञाननिर्मिती, संशोधन आणि नावीन्य यांचा केंद्रबिंदू म्हणून विद्यापीठांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. रामदेव बाबा विद्यापीठही या परंपरेला अधिक बळकट करत देशातील संशोधन आणि नवोन्मेषाला नवी दिशा देईल, असा मला विश्वास आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विद्यापीठातील एआय सेंटर फॉर कॉम्पिटन्सीचे डिजिटल पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना श्रीरामदेवबाबा सार्वजनिक समितीचे अध्यक्ष पद्मश्री सत्यनारायण नुवाल यांनी आपल्या मनोगतात हे केंद्र संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. तर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आर.एस. पांडे यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यापीठाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

## 'भक्तिमय नाट्यगीत'ने रंगवला भक्तिरसाचा सुरेल सोहळा

**आषाढी एकादशीच्या निमित्ताने नाट्यसंगीत आणि भक्तीगीतांचा अनोखा संगम; रसिकांकडून उत्स्फूर्त दाद**




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सप्तक नागपूर, नादचक्र संस्था नागपूर आणि अरुणाई यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीच्या मंगल पवार्चे औचित्य साधत संगीत आणि भक्तीचा अप्रतिम संगम घडविणारा भक्तिमय नाट्यगीत हा विशेष संगीतमय कार्यक्रम रविवारी गायत्रीनगर येथील पर्सिस्टंट सिस्टिम्सच्या कविकुलगुरू कालिदास सभागृहात उत्साहात पार पडला. सांगलीचे राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक अभिषेक काळे, तसेच रसिका कुलकर्णी-करमाळेकर आणि राधा ठेंगडी-खडसे यांनी सादर केलेल्या भक्तीभावपूर्ण नाट्यसंगीताच्या माधुर्याने सजलेल्या या मैफिलीला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रसिक भक्तिरस आणि सुरेल नाट्यसंगीताच्या स्वरांनी भारावून गेले. कार्यक्रमाची संकल्पना राधा ठेंगडी-खडसे यांची होती, तर संयोजनाची जबाबदारी गौरव बेलसरे आणि राम खडसे यांनी समर्थपणे सांभाळली.

कार्यक्रमाची सुरुवात पंचतुंड नररुंडमालधर या सुरेल नांदीने झाली. त्यानंतर अभिषेक काळे यांनी राम रंगी रंगले, जय शंकरा गंगाधरा, धाव घाली विठु आता, राधाधर माधुमिलिंद आणि अवघे गरजे पंढरपूर ही भक्तिरसाने नटलेली नाट्यगीते सादर करून रसिकांची मने जिंकली. रसिका कुलकर्णी-करमाळेकर यांनी दिन गेले भजनाविणा, कधी भेटेन वनवासी आणि जोहार मायबाप, तर राधा ठेंगडी-खडसे यांनी पतित तू पावना, सोऽहम् हर डमरू बाजे, नारायणा रमारमणा ही भावपूर्ण भक्तिगीते सादर केली.

कार्यक्रमाची सांगता परब्रह्म भेटी, कैवल्याच्या चांदण्याला आणि वैकुंठाच्या राया या भैरवीने झाली. संपूर्ण मैफिलीत भक्तिरस आणि नाट्यसंगीताचा सुरेल आविष्कार अनुभवायला मिळाला. मैफिलीत श्रीकांत पिसे, राम खडसे, श्रीधर कोरडे, श्रेयस नेमाड आणि तुषार हुड यांनी आपल्या उत्कृष्ट वादनाने गायनाला सुरेख साथ दिली. प्रत्येक सादरीकरणानंतर रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाचे प्रभावी निवेदन श्रेयस बडवे यांनी केले, तर प्रास्ताविक डॉ. उदय गुप्ते यांनी केले. यावेळी गौरव बेलसरे, विलास मानेकर, प्रदीप मुनशी, उदय पाटणकर, विवेक अलोणी, विकास लिमये, प्रमोद कळमकर, नितीन सहस्त्रबुद्धे यांची उपस्थिती होती. संगीतप्रेमी व रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घोगली, गुमथला, लोणारा गावातील शेतपिकांचे नीलगाय, रोही, जंगली डुक्करांकडून नासधूस

**कर्जबाजारी शेतकरी वन्यप्राणामुळे हवालदिल**

**दै. सिंहवाणी वृत्त, मिलिंद गाडेकर/कोराडी**

घोगली, गुमथलां, लोणारा या गावातील शिवारात असलेल्या शेतात मोठ्याप्रमाणात नीलगाय, रोही, जंगली डुक्कर, हरिण, या वन्य प्राणी मुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन, तूर आणि भाजीपाला पिकांचे नुकसान होते आहे. शेतात गेला तर जंगली डुक्कर अटॅक करू शकतो, शेतात मजूर महिला गेल्या तर त्यांच्या जीविताला देखील धोका उत्पन्न झाला आहे. अशा स्थितीत जंगली प्राणी पासून



शेतकरी कसा वाचेल आणि त्यांच्या जीवितास धोका झाला तर शासनाकडे काय उपाययोजना आहेत, अशा मागणीचे निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री महोदयांना शनिवारी देवीमंदिर कोराडी येथील जनता दरबारात देण्यात आले. या प्रकरणी आपण महाराष्ट्र शासन,मुख्यमंत्र्यांशी कॅबिनेटमध्ये प्रस्ताव ठेवून आवश्यक ती खबरदारी शेतकऱ्यांच्या हितावह नक्कीच निर्णय घेणार अशी ग्वाही शेतकऱ्यांना दिली आहे.

## रंजक आठवणी, किस्से, गीतांनी रंगली मैत्रीदिनाची संध्या

**डॉ. मृदुला दाढे यांच्या 'आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर गायकी विशेष' संगीतमय कार्यक्रमाला हाऊसफुल प्रतिसाद**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आपल्या ओघवत्या निवेदनातून ज्येष्ठ साहित्यिका व वक्त्या डॉ. मृदुला दाढे यांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांच्या अजरामर गायकीचा सुरेल प्रवास रंजक आठवणी, किस्से आणि गीतांच्या माध्यमातून उलगडत मैत्रीदिनाची संध्या अविस्मरणीय केली. राम गणेश गडकरी स्मृती प्रतिष्ठान, विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि आधार बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मैत्रीदिनानिमित्त शंकरनगर येथील साई सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या विशेष संगीतमय कार्यक्रमाला रसिकांचा हाऊसफुल प्रतिसाद लाभला.

सुरुवातीला आशा भोसले यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीचे विविध पैलू त्यांनी रसिकांसमोर उलगडून दाखवले. कार्यक्रमादरम्यान सादर करण्यात आलेल्या अजरामर गीतांनी उपस्थित संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध केले. आशा भोसले यांचे व्यक्तिमत्त्व आणि आवाज यातील संबंध त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केला. आशा भोसले यांचे आयुष्य म्हणजे सततचा संघर्ष आणि त्यामुळे त्यांच्या आवाजात एक प्रकारची बंडखोरी असल्याचे त्या म्हणाल्या. 'संसार मांडते मी' हे



गाणे गाताना त्यांचा आवाज एखाद्या हलक्या आचेप्रमाणे, तर 'मलमली तारुण्य माझे' म्हणताना त्यातील मादक उष्णता जाणवत असल्याचे त्यांनी सांगितले. आवाजातील विलक्षण खणखणीतपणा, अभिनयक्षमता आणि गाणे जगण्याची वृत्ती ही आशाताईंच्या गायकीची वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी उलगडून सांगितले. याचबरोबर आशाताईंच्या आवाजातील फिरत, शैली आणि खट्याळपणा याविषयीही त्यांनी विविध गाण्यांच्या माध्यमातून माहिती दिली. शोख नजर की बिजली या गाण्यातून जणू आपण बर्फाळ प्रदेशात असून अंगावर हुडहुडी भरत असल्याचा आभास आशाताईंनी निर्माण केल्याचे त्यांनी गाऊन दाखवले. तसेच बहुत शुक्रिया हे गीत आणि दाजीबा या लावणीचे काही भागही त्यांनी सादर केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात त्यांनी सुमन कल्याणपूर यांचे वर्णन अत्यंत प्राजक्तासारख्या कोमल आवाजाच्या आणि नावाप्रमाणेच सुमन, राजस, सौम्य व शालीन व्यक्तिमत्त्वाच्या गायिका असे केले. त्यांचा आवाज अत्यंत हलका, रेशमी आणि कानाला सुखावणारा असल्याचे सांगत, त्यातील नाजूक कंप आणि गोड उच्चार ही त्यांच्या गायकीची खास वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी नमूद केले. आवाजाला असलेला शास्त्रीय संगीताचा आधार आणि इतर विविध पैलू उलगडत त्यांनी कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्राची सुरुवात छेडीत तार हे गाणे गाऊन केली. त्यानंतर एका पेक्षा एक सरस किस्से सांगत त्यांनी विविध गीते सादर केली. सन २००५ पासून जागतिक मैत्रीदिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या या विशेष कार्यक्रमाचे यंदाचे २२ वे वर्ष होते. या निमित्ताने मैत्री, संगीत आणि सांस्कृतिक जपणुकीचा सुंदर संगम अनुभवण्याची संधी रसिकांना मिळाली. प्रारंभी डॉ. अविनाश रोडे यांनी डॉ. मृदुला दाढे यांचा सत्कार केला. डॉ. शुभदा फडणवीस यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : सोमवार, ३ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## आश्रम शाळा अधीक्षक मुख्याध्यापक यांना पॉक्सो कायद्याअंतर्गत प्रशिक्षण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष व अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभाग यांच्या वतीने वनामती, नागपूर येथे दिनांक ३० जुलै २०२६ रोजी "लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (POCSO Act, 2012)" या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणामध्ये नागपूर विभागातील आश्रम शाळांचे अधीक्षक व मुख्याध्यापक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. निवासी आश्रम शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या बालकांच्या संरक्षणासाठी कायदेशीर तरतुदींची माहिती देणे, बालसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरणाची निर्मिती करणे हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश होता.

सदर प्रशिक्षणात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी POCSO अधिनियमाची उद्दिष्टे, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण, बालकांशी संवेदनशीलतेने वागण्याची पद्धत, अत्याचाराची लक्षणे ओळखणे, तक्रार नोंदविण्याची कायदेशीर प्रक्रिया, संबंधित विभागांची जबाबदारी तसेच आश्रम शाळांमध्ये बालसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी निवासी शाळांमध्ये बाल संरक्षण धोरण (Child Protection Policy) प्रभावीपणे राबविणे, बालकांसाठी सुरक्षित, सन्मानपूर्ण व भयमुक्त वातावरण निर्माण करणे तसेच POCSO कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अधीक्षक व मुख्याध्यापकांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन करण्यात आले.

## प्रदीप पंढरीनाथ जोशी यांचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई- गुरुनाथ तिरपणकर**

आयुर्विद्या प्रसारक मंडळ संचालित आयुर्वेद महाविद्यालय शिव मुंबईतर्फे आयोजित पंचकर्म कार्यशाळा निमित्त मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले व संस्थेत ५० वर्ष सलग, अखंडित,अविरत, निस्वार्थ व निष्ठापूर्वक सेवा दिलेले प्रदीप पंढरीनाथ जोशी यांचा प्रदीर्घ सेवेचा व प्रिती जोशी यांनी त्याना खंबीर साथ दिल्याबद्दल आणि त्यांच्या सेवेचा सत्कार, संस्थेचे सरकार्यवाह डॉ. आशानंद सावंत यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व जीवनगौरव पुरस्कार सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त व प्राध्यापक डॉ. विश्वजित पाताडे नियामक मंडळ सदस्य डॉ. राजन पाटणकर, प्राचार्य. डॉ. रविदास मोरे, माजी प्राचार्य डॉ. कामत व डॉ. सातपुते उपप्राचार्य डॉ. पाथरीकर व डॉ. शिला कोहाड, डॉ. पंकज ताथेड व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, आंतरवाशी वैद्य मोठ्या संख्येनं उपस्थित होते व डॉ. हेमंत पराडकर यांनी प्रदीप पंढरीनाथ जोशी यांच्या ५०वर्षीय सेवेचा, सामाजिक, संघटनात्मक व पत्रकारिता कायार्चा परिचय करून दिला व त्यानंतर प्रदीप जोशी यांनी या सत्कार विषयी आपले मनोगत व्यक्त केले व वैद्य पंकज ताथेड यांनी सर्वांचे आभार मानले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नागपूर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नागपूर येथे प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सुकेशिनी तेलगोटे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर या प्रामुख्याने उपस्थित होत्या.

सदर प्रसंगी ईशा भूते, सहाय्यक लेखाधिकारी, अनामिका बाराहाते, दिपक कुसरे, मनोहर उचे, छाया बागडे, निलोफर अली, दिनेश सुखदेवे, आरती सुखदेवे, अर्चना सातघरे, सारीका बोरकर, जयश्री धवराळ, प्रिती भांगे, गणेश बच्छे, हेमंत खवशी, विवेक दांडेकर, विवेक गजभिये, गजानन शेळके, अमित कांबळे, चंदन त्रिमले, सुहानी कोवे, प्रतिभा डागोर, वैभव भारती, लकी गाडबैल, गणेश ठाकरे, हितेश शहारे, कोमलचंद बारापात्रे, सचिन मोहाडीकर, तसेच प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बुडून १८ वर्षीय युवकाचा मृत्यू

**वृत्तसंस्था, मुंबई**

नालासोपारा पूर्वमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. गालानगर शेजारी असलेल्या नागेला तलावात बुडून १८ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला आहे. सोहेल शेख असं या युवकाचं नाव आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी वसई-विरार महानगरपालिकेच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, निष्काळजीपणाचा आरोप केला आहे.

# लटोरी ग्रामपंचायतीत स्मशान शेड नाही, ८५ वर्षीय महिलेवर ताडपत्रीखाली अंत्यसंस्कार

### मुसळधार पावसात बांबू-बल्ल्यांचा आधार घेऊन देण्यात आला अखेरचा निरोप, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींविरोधात ग्रामस्थांचा तीव्र संताप

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- प्रकाश टेंभरे**



३१ जुलै एकीकडे शासन ग्रामीण विकास, पायाभूत सुविधा आणि "अंत्योदय"चे मोठमोठे दावे करत आहे, तर दुसरीकडे गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्याअंतर्गत लटोरी ग्रामपंचायतीत घडलेल्या एका हृदयद्रावक आणि लज्जास्पद घटनेने या दाव्यांचे वास्तव समोर आणले आहे. अनेक वर्षांपासून स्मशान शेडची मागणी करणाऱ्या ग्रामस्थांचा आवाज आजही शासकीय फाईलमध्येच दडपून राहिला आहे. परिणामी, एका ८५ वर्षीय वृद्ध महिलेवर मुसळधार पावसात ताडपत्रीचा आधार घेऊन अंत्यसंस्कार करण्याची वेळ आली.

प्राप्त माहितीनुसार, दुलमतबाई भीवराम मच्छीरके (वय ८५) यांचे २९ जुलै रोजी निधन झाले. कुटुंबीयांनी ३० जुलै रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्याची तयारी केली. मात्र, सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि स्मशानभूमीत कोणत्याही प्रकारच्या छताची अथवा शेडची व्यवस्था नसल्याने अंत्यसंस्कार करणे अत्यंत कठीण झाले.

पाऊस इतका जोरात होता की चिता तयार करणेही अवघड झाले. अशा परिस्थितीत नातेवाईक आणि ग्रामस्थांनी मजबुरीने बांबू-बल्ल्यांचा तात्पुरता सांगाडा उभारला आणि त्यावर ताडपत्री बांधून कशीतरी अंत्यसंस्काराची प्रक्रिया पूर्ण केली. हे दृश्य तेथे उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू आणणारे होते. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, ही केवळ एका कुटुंबाची वेदना नसून संपूर्ण गावाच्या अनेक वर्षांच्या दुर्लक्षाचा परिणाम आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, लटोरी ग्रामपंचायतीत स्मशान शेड उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीपासून संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींपर्यंत अनेकदा निवेदने देण्यात आली, मात्र प्रत्येक वेळी केवळ आश्वासनच मिळाले. आजपर्यंत स्मशानभूमीत साधे शेडदेखील उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. पावसाळ्यात गावात एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांसमोर अंत्यसंस्कार करण्याचे मोठे संकट उभे राहते. उघड्या आकाशाखाली पेटणारी चिता, मुसळधार पाऊस, चिखल आणि अव्यवस्थेमध्ये अंत्यसंस्कार करणे हे केवळ कठीणच नाही, तर मृत व्यक्तीच्या सन्मान आणि मानवी प्रतिष्ठेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

या घटनेनंतर गावात प्रशासन आणि लोकप्रतिनिधींविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, निवडणुकीच्या काळात विकासाची मोठमोठी आश्वासने दिली जातात; मात्र मूलभूत सुविधांकडे कोणाचेही लक्ष नसते. ज्या गावात नागरिकांना सन्मानाने अंत्यसंस्कार करण्याची सुविधादेखील उपलब्ध नाही, त्या गावातील विकासाचे दावे पूर्णपणे पोकळ ठरतात. ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, लवकरात लवकर लटोरी ग्रामपंचायतीच्या स्मशानभूमीत कायमस्वरूपी शेडचे बांधकाम करण्यात आले नाही, तर ते लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यास बाध्य होतील. भविष्यात कोणत्याही कुटुंबावर अशी वेदनादायी आणि अपमानास्पद वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी त्यांची मागणी आहे.

ही घटना केवळ एका वृद्ध महिलेच्या अंत्यसंस्काराची नसून ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांची दयनीय अवस्था आणि प्रशासनाच्या उदासीनतेचे जिवंत उदाहरण आहे. आता या हृदयद्रावक घटनेनंतर जबाबदार अधिकारी आणि लोकप्रतिनिधी जागे होणार की हा विषयही इतर मागण्यांप्रमाणे फाईलमध्येच दडपून जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# 'गांजा विक्रेत्यांवर जलालखेडा पोलिसांचा करडा प्रहार'

## २६० ग्रॅम गांजासह आरोपी रंगेहात अटक

### लोहारी सावंगा-कारंजा मार्गावरील धडक कारवाई; एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा, ६ हजारांचा मुद्देमाल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नागपूर ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधातील मोहिम अधिक तीव्र करत जलालखेडा पोलिसांनी गांजाच्या अवैध विक्रीवर मोठा घाव घातला आहे. गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचत पोलिसांनी २६० ग्रॅम गांजासह एका आरोपीला रंगेहात अटक केली. या कारवाईमुळे अंमली पदार्थांच्या अवैध व्यवसायात गुंतलेल्या घटकांचे धाबे दणाणले असून परिसरात पोलिसांचा धाक पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

पोलिसांना लोहारी सावंगा ते कारंजा मार्गावर एक व्यक्ती गांजाची विक्री करत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती.

त्यानुसार ठाणेदार पवन भांबूरकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी सापळा रचला. दरम्यान, हरिभाऊ राकृष्ण कामडी (वय ५८, रा. लोहारी सावंगा, ता. नरखेड) हा गांजाची विक्री करत असताना पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

पंचांसमक्ष आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून २६० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या गांजाची किंमत सुमारे ४ हजार रुपये असून, आरोपीकडील २ हजार रुपये किमतीचा मोबाईलही पोलिसांनी ताब्यात घेतला. एकूण ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी जलालखेडा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) व २०(ब)(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीकडून गांजा नेमका कुठून आणला आणि आणखी कोणाचा या रॅकेटमध्ये सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी जलालखेडा पोलीस सातत्याने विशेष मोहीम राबवत असून, नागरिकांनीही अशा प्रकारची माहिती तत्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# इंडोनेशियातील मदुरा बेटाजवळ जहाजाला आग, ५ जणांचा मृत्यू, तर ४१ जण बेपत्ता, २२५ जणांना वाचवण्यात यश

**वृत्तसंस्था, इंडोनेशिया**

इंडोनेशियातील मदुरा बेटाजवळ धक्कादायक घटना घडली आहे. एका जहाजाला आग लागल्याची घटना घडली आहे. यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तर ४१ जण बेपत्ता, २२५ जणांना वाचवण्यात यश आले आहे. आग लागली तेव्हा जहाजावर २७१ प्रवासी आणि कर्मचारी होते असी माहिती देखील मिळाली आहे.



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडोनेशियातील मदुरा बेटाजवळ एका प्रवासी जहाजाला आग लागल्याने पाच जणांचा मृत्यू झाला असून ४१ जण बेपत्ता आहेत. घटनेपासून बचावकार्य सुरू आहे. इंडोनेशियाच्या बचाव संस्थेनुसार, आग लागली तेव्हा जहाजावर २७१ प्रवासी आणि कर्मचारी होते. रविवार दुपारपर्यंत किमान २२५ जणांना वाचवण्यात यश आले होते. बेपत्ता झालेल्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**बचावासाठी अनेक जहाजे तैनात**

मिळालेल्या माहितीनुसार, हे जहाज पूर्व जावा प्रांतातील सुराबाया येथून दक्षिण सुलावेसीमधील मकासारकडे जात असताना जावाच्या ईशान्य किनाऱ्याजवळील मदुरा बेटाजवळ त्याला आग लागली. बचाव कार्यासाठी अनेक जहाजे तैनात करण्यात आली आहेत. दरम्यान, अधिकारी जहाजावरील लोकांना शोधण्यासाठी आजूबाजूच्या पाण्यात शोधमोहीम राबवत आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, प्रवासी जहाज पूर्व जावा प्रांतातील सुरबाया येथून दक्षिण सुलावेसीमधील मकासारकडे प्रवास करत होते. प्रवासादरम्यान, जावाच्या ईशान्य किनाऱ्याजवळ असलेल्या मदुरा बेटाजवळ पोहोचल्यावर जहाजाला अचानक आग लागली. यानंतर अनेक प्रवाशांनी लाईफ जॅकेट घालून जीव वाचवण्यासाठी समुद्रात उडी घेतली, तर जहाजावरील कर्मचारी आग विझवण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, परिस्थिती झपाट्याने पसरली आणि नियंत्रणाबाहेर गेली.

या घटनेची माहिती मिळताच इंडोनेशियाची राष्ट्रीय शोध आणि बचाव संस्था (बसारनास) सक्रिय करण्यात आली. अनेक बचाव जहाजे, बोटी आणि सागरी सुरक्षा संस्थांची पथके तैनात करण्यात आली आहेत. आजूबाजूच्या पाण्यात बेपत्ता प्रवाशांचा शोध सुरू आहे. बचाव पथके समुद्रात भरकटलेल्या लोकांचा शोध घेत आहेत, तसेच जहाजाच्या आजूबाजूच्या परिसराचीही कसून तपासणी करत आहेत. हवामान अनुकूल राहिल्यास अधिक लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढता येईल, अशी आशा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# जनआरोग्य समितीच्या बैठकीत मोठा गोंधळ, उशिरा आलेल्या तालुका आरोग्य अधिकाऱ्यांवर अध्यक्षांच्या अधिकारांचा अवमान केल्याचा आरोप

### सीएचओ कर्मचाऱ्यांच्या तक्रारींनीही डॉ. स्वप्निल आतराम अडचणीत; लोकप्रतिनिधींचा संताप, जिल्हा परिषदेकडे तक्रार दाखल करण्याची तयारी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - प्रकाश टेंभरे**




सालेकसा तालुक्यातील दरेकसा प्राथमिक आरोग्य केंद्रात २८ जुलै २०२६ रोजी झालेल्या जनआरोग्य समितीच्या बैठकीत मोठा वाद निर्माण झाला. बैठकीला जवळपास एक तास उशिरा पोहोचलेल्या तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल आतराम यांनी बैठकीच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतल्याने वातावरण चांगलेच तापले. बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधी आणि समिती सदस्यांनी त्यांच्या वर्तनाला आक्षेप घेत अध्यक्षांच्या अधिकारांचा अवमान केल्याचा गंभीर आरोप केला.

जिल्हा परिषद सदस्या तथा जनआरोग्य समितीच्या अध्यक्षा गीता ओमप्रकाश लिल्हारे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १ वाजता बैठक नियोजित वेळेनुसार सुरू झाली. समितीचा कोरम पूर्ण झाल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीचे कामकाज सुरू करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचारी, विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, समिती सदस्य तसेच तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधी म्हणून डॉ. अंजली पांडे उपस्थित होत्या.

मात्र, बैठकीला सुमारे एक तास उशिरा पोहोचलेल्या डॉ. स्वप्निल आतराम यांनी "माझ्या येण्यापूर्वी बैठक कशी सुरू झाली?" असा प्रश्न उपस्थित करत बैठकीच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. यानंतर बैठकीत तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

समिती सदस्य मधु ओकटे यांनी शासनाच्या नियमानुसार कोरम पूर्ण झाल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने बैठक सुरू करण्यात आल्याचे स्पष्ट केले. तसेच अधिकारी स्वतः जवळपास एक तास उशिरा आल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणून दिली.

पिपरिया ग्रामपंचायतीचे सरपंच व समिती सदस्य गुणाराम मेहर यांनीही अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "उशिरा आलेल्या अधिकाऱ्यांनी उपस्थित सदस्यांची माफी मागणे अपेक्षित असताना बैठकीच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करणे योग्य नाही," असे त्यांनी सांगितले.

बैठकीत उपस्थित अनेक लोकप्रतिनिधींनी जनआरोग्य समितीच्या अध्यक्षांच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे हे लोकशाही व्यवस्थेला व समितीच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे असल्याचा आरोप केला. शासनाच्या नियमानुसार अध्यक्षांच्या परवानगीने व कोरम पूर्ण झाल्यानंतर बैठक सुरू करणे पूर्णपणे वैध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या संपूर्ण प्रकाराबाबत जिल्हा परिषद सदस्या व समितीच्या अध्यक्षा गीता लिल्हारे या जिल्हा परिषदेकडे औपचारिक तक्रार दाखल करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. बैठकीतील कथित गैरवर्तन व अध्यक्षीय अधिकारांचा अवमान याचा उल्लेख तक्रारीत करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे.

याच दरम्यान आणखी एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. सालेकसा तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये कार्यरत सुमारे १२ सामुदायिक आरोग्य अधिकारी (सीएचओ) यांनी संयुक्त स्वाक्षरीसह जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे तक्रार सादर केली आहे. या तक्रारीत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल आतराम यांच्यावर कर्मचाऱ्यांना त्रास देणे, अधिकारांचे उल्लंघन करणे, वेळेवर कार्यालयात उपस्थित न राहणे, दादागिरीची वागणूक देणे, धमकावणे तसेच प्रशासकीय अनियमितता केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे.

या सर्व घडामोडींमुळे सालेकसा तालुक्यातील आरोग्य विभागातील कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हा प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.